दैनिक

# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार





श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या

आपणास व आपल्या परिवारास

हार्दिक शुभेच्छा!



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६५ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६


# अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात सरकारकडून माहिती दडवण्याचा प्रयत्न

## नाना पटोले यांचा आरोप

**वृत्तसंस्था, मुंबई**

दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी विरोधकांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या दुर्घटनेबाबत पोलिसांत अद्याप एफआयआर नोंदवण्यात न आल्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आता काँग्रेसनेही जाहीरपणे उपस्थित केले आहे. अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणावर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, अजितदादांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवत आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतलेली भूमिका अत्यंत योग्य आणि रास्त आहे.

सध्या सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे जे आमदार सत्तेत आहेत, त्यांनी या प्रकरणावर गुन्हा का दाखल झाला नाही, अशी कोणतीही भूमिका अद्याप मांडलेली नाही. त्यांच्या आमदारांनी एफआयआरची साधी मागणीही केली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात काय गोम दडली आहे, हे कळायला मार्ग नाही.



देशाचा जीडीपी वाढल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या गुड न्यूजवर नाना पटोले यांनी जोरदार टीका केली. पंतप्रधानांनी सोशल मीडियावर जीडीपी वाढल्याचा आनंद व्यक्त केला, पण देशभरातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनीच या दाव्यांची पोलखोल करत त्यांना ट्रोल केले आहे.

जर भारताचा जीडीपी ७.८ टक्के इतका प्रचंड वाढला असेल आणि जागतिक पातळीवर देश अव्वल ठरत असेल, तर देशात महागाई का वाढत आहे? बेरोजगारी का संपलेली नाही? शेतकरी आत्महत्या का करत आहेत? जर अर्थव्यवस्था इतकी बळकट झाली असती, तर देशात सगळीकडे आलबेल वातावरण असायला हवे होते. जनतेसमोर खोटे आकडे फेकून दिशाभूल केली जात आहे, असा थेट निशाणा पटोले यांनी साधला.

### अजितदादांच्या अपघाताचा तपास कुठपर्यंत आला, हेच आम्हाला माहिती नाही! : सुप्रिय सुळे



**पुणे :** पुणे महाविद्यालयातून केवळ फोटो हटवला म्हणून अमित ठाकरे यांच्यावर अवघ्या दोन तासांत गुन्हा दाखल होतो. मात्र, सत्तेत बसलेल्या उपमुख्यमंत्र्यांचा इतका मोठा भीषण विमान अपघात होऊन त्यांचा मृत्यू होतो, तरीही सरकार साधा गुन्हा नोंदवत नाही.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर बोलताना सुप्रिया सुळे अत्यंत भावूक आणि आक्रमक झाल्या. अमित ठाकरे यांनी फोटो काढला म्हणून लगेच कारवाई होते. आम्ही आमच्या घरातील कर्ता पुरुष गमावला. एका विद्यमान उपमुख्यमंत्र्यांचा एवढा मोठा अपघात होतो, पण त्यावर सरकार एफआयआर का नोंदवत नाही? तपासाची नेमकी परिस्थिती काय आहे, हेही कोणाला माहीत नाही. अजित पवारांचा पक्ष सत्तेत भागीदार आहे, त्यांचे ४० आमदार आणि मंत्री सत्तेत बसून मलिदा खात आहेत. मात्र, त्या एकाही आमदाराने किंवा मंत्र्याने माज्या भावाच्या मृत्यूची चौकशी व्हावी किंवा एफआयआर दाखल व्हावा म्हणून आजपर्यंत एक शब्दही उच्चारला नाही. भाऊ आमचा गेला आणि सत्ता हे भोगत आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

### थोडक्यात

## महाप्रसाद, लंगर, भंडारा एफडीआयच्या रडारवर

**मुंबई :** हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा सर्व धर्मांच्या सण आणि उत्सवाच्या वेळी अन्नपदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने स्थायी आदेश काढले आहेत. स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स म्हणून वर्षभर लागू असणाऱ्या या नव्या आदेशांमुळे सण व उत्सवांच्या काळात मिळणाऱ्या महाप्रसाद, लंगर आणि भंडा-यांमधील अन्नाची गुणवत्ताही अन्न व औषध प्रशासनाकडून तपासली जाणार आहे. सणासुदीच्या काळात मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा तसेच मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मियांच्या सणांमध्ये मांसाहारी पदार्थांची मागणी मोठया प्रमाणात वाढते. त्यामुळे या काळात भेसळही मोठ्या प्रमाणात होते. हे रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने वर्षभराचे विशेष कॅलेंडरच तयार केले आहे. सर्वधर्मीय सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण करण्यात आले. यामध्ये गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ आणि नववर्ष पूर्वसंध्येचा प्रथम श्रेणीत (राज्यव्यापी) समावेश आहे. मकर संक्राती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी वारी, श्रावण मास, दहीहंडी आणि गुरुनानक जयंती यांचा द्वितीय श्रेणीत (प्रादेशिक) तर स्थानिक जत्रा, पालखी सोहळे आणि उरुस यांचा तृतीय श्रेणीत समावेश करण्यात आला.

## धाराशिवमध्ये आईची तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यावरून उडी; माय-लेकाचा मृत्यू, दोन चिमुकल्या गंभीर



**वृत्तसंस्था, धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातून एक अत्यंत मन हेलावून टाकणारी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यावरून एका आईने आपल्या तीन निष्पाप चिमुकल्या मुलांसह थेट खाली उडी मारली. या दुर्दैवी घटनेत आई आणि एका मुलाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर दोन लहान मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. या भीषण घटनेमुळे संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने मदतकार्य राबवून जखमी चिमुकल्यांना बाहेर काढले. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही मुलींवर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील तातडीच्या उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, आत्महत्या करणारी महिला ही धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील वंताळा गावची रहिवासी असल्याचे समोर आले आहे.

त्या माऊलीने पोटच्या तीन लहान लेकरांसह नळदुर्ग किल्ल्यासारख्या उंचावरून उडी मारून इतके टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. घरगुती वाद किंवा अन्य काही कारण आहे का, याचा सखोल तपास नळदुर्ग पोलीस करत आहेत. माय-लेकाच्या अशा अचानक आणि दुर्दैवी अंतामुळे वंताळा गावावर शोककळा पसरली असून दोन गंभीर जखमी चिमुकल्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना केली जात आहे.

## फडणवीसांना उपपंतप्रधानपद देण्याची शक्यता : संजय राऊत

**वृत्तसंस्था, मुंबई**

संजय राऊत म्हणाले की, मोदींच्या मंत्रिमंडळात त्यांचा वारसदार म्हणून ज्या व्यक्तीची निवड होईल, त्यांनाच उपपंतप्रधानपद दिले जाण्याची चर्चा आहे. संघाची भूमिका लवकरच समोर येईल. ती व्यक्ती सध्या दिल्लीत नसून देवेंद्र फडणवीस यांना ही मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते, एवढी माहिती माझ्याकडे आहे. संजय राऊत म्हणाले की, राम मंदिराला सीईओ देत त्यांचा व्यापार करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू आहे. जेडीपीचा आकडा फुगवत देशातील जनतेला फसवले जात आहे. पंतप्रधान मोदींनी देशातील नागरिकांना मोफत राशन आणि महिलांना पैसे देण्याची सवय लावत देशाचा





जीडीपी कसा वाढेल असा सवाल राऊत यांनी केला आहे. मोदींचा फोटो काढला म्हणून देशद्रोह झाल्यासारखा लगेच अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल करण्यात आला ही कुठली व्यवस्था आहे?

**केंद्रीय मंत्रिमंडळात अंतर्गत तीव्र असंतोष**

संजय राऊत म्हणाले की, आपल्या देशाचा इतिहास पाहिला तर गृहमंत्री राहिलेली कोणतीही व्यक्ती पंतप्रधान झालेली नाही. अमित शहा यांना पंतप्रधान होण्याची तीव्र इच्छा आहे, पण ते शक्य होणार नाही. जर मंत्रिमंडळात फेरबदल करायचे असतील तर आधी अमित शहा यांचा राजीनामा घ्या, मगच आम्ही राजीनामा देऊ, असा इशारा काही वरिष्ठ मंत्र्यांनी थेट पंतप्रधानांना दिला आहे. अन्यथा तुम्ही आम्हाला बाजूला काढा असे संघाच्या जवळील काही मंत्र्यांनी मोदींना सांगितले आहे.

# डीजे बंदीवरून नागपुरच्या भाजप आमदारांत 'मते-मतांतरे'

### माजी आमदार संदीप जोशींचा डीजेला नकार, मध्य नागपुरचे आमदार प्रवीण दटकेंचा हिंदुसणांवेळी डीजे बंदीला विरोध, शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी म्हणतात सरसकट बंदी का नाही?





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**


मागील दोन दिवसापासून ऑनलाइन पीटिशनद्वारे लोकसहभाग मिळविण्यासाठी डी.जे. व लेझर लाईट या दोन्ही बाबींवर कायमस्वरुपी बंदी आणण्यासाठी जनचळवळ सुरु झाली. यामध्ये ऑनलाइन पीटीशनला अत्यंत उत्कृष्ट लोकसहभाग मिळाला.

उत्सव कोणताही असो, आनंद साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र आनंदाच्या नावाखाली होणारा कर्णकर्कश डी.जे., ध्वनिप्रदूषण आणि अतितीव्र लेजर लाईटचा अतिरेक आता थांबला पाहिजे. डी.जे.च्या वापरावर बंदी आणण्याच्या मागणीसाठी नागपुरात व्यापक जनचळवळ उभारण्यात आली असून, या चळवळीचा पहिला टप्पा म्हणून ऑनलाइन पेटिशनद्वारे नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात येत आहे, अशी माहिती माजी आमदार, माजी महापौर संदीप जोशी यांनी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना संदीप जोशी म्हणाले की, ही चळवळ कोणत्याही धर्माच्या, उत्सवाच्या किंवा समाजाच्या विरोधात नाही. सर्वधर्मीय सण-उत्सव, लग्नसमारंभ, सामाजिक कार्यक्रम, शहरातील मोठे इव्हेंट तसेच निवडणुकीच्या मिरवणुका यामध्ये आनंद व्यक्त करण्याचा अधिकार सर्वांना आहे. मात्र एका व्यक्तीच्या किंवा समूहाच्या आनंदासाठी दुसऱ्या नागरिकाच्या आरोग्याशी आणि शांततेशी तडजोड होऊ नये.

उत्सवाचा आनंद हवा, जल्लोष हवा; पण कर्णकर्कश आवाज नको. डी.जे.चा अतिरेक हा केवळ काही मिनिटांचा त्रास नसून नागरिकांच्या आरोग्याशी आणि शांततेशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे आता या विषयाकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता व्यापक लोकचळवळीच्या माध्यमातून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची वेळ आली आहे, असे संदीप जोशी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला डॉ. मंजुषा गिरी, डॉ. सचिन गाठे, तेजिंदरसिंह रेणू, डॉ. अजय देशपांडे, भंते प्रज्ञानंदजी महाथेरो, विवेक रानडे, डॉ. गोपाल अरोरा, सुरेश रेवतकर, अशफाक शेख यांची उपस्थिती होती.

डी.जे.च्या मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण आणि सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे विद्यमान ध्वनिप्रदूषण नियमांची कठोर आणि समान पद्धतीने अंमलबजावणी करावी आणि पुढील काळात डी.जे.च्या वापरावर बंदी आणण्यासाठी आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात येणार आहे. अतितीव्र लेजर लाईटच्या वापराबाबतही स्पष्ट नियम व नियंत्रण असावे, अशी भूमिका घेण्यात आली.





आमदार प्रवीण दटके यांनी हिंदू सणांवेळी केलेल्या डीजेबंदीला अशा पोस्टव्दारे विरोध दर्शविला.

### डीजेवर सरसकट बंदी नको, आवाजावर मर्यादा घालावी; पोलीस प्रशासनाने सरसकट बंदीवर पुनर्विचार करावा : दयाशंकर तिवारी



नागपूर पोलीस आयुक्तांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत दिनांक ३ सप्टेंबर २०२६ ते ०१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीसाठी डॉल्बी, मल्टीस्पीकर साऊंड सिस्टिम तसेच बीम व लेझर लाईटच्या वापराबाबत काढलेल्या अधिसूचनेचा पुनर्विचार करावा. सरसकट यंत्रणा किंवा साऊंड सिस्टिमवर बंदी घालण्यापेक्षा ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार आवाजाची डेसिबल मर्यादा निश्चित करून तिची कठोर अंमलबजावणी करणे अधिक योग्य ठरेल.अशा साऊंड सिस्टिम व्यवसायावर अनेक कुटुंबांचा रोजगार अवलंबून असून, सरसकट बंदीमुळे त्यांच्या रोजगारावर संकट येण्याची शक्यता आहे. तसेच हा नियम केवळ गोकुळाष्टमी, दहीहंडी, गणेशोत्सव, धम्मचक्र प्रवर्तन दिन, दुर्गादेवी उत्सव यांसारख्या विशिष्ट उत्सवांपुरता मर्यादित न ठेवता, शहरातील सर्व प्रकारच्या सार्वजनिक कार्यक्रमांसाठी समान निकषांवर लागू व्हावा. त्यामुळे पोलीस प्रशासनाने यंत्रांवर बंदी न घालता डेसिबलची स्पष्ट मयार्दा निश्चित करून तिचे काटेकोर नियंत्रण व अंमलबजावणी करावी आणि अधिसूचनेचा तातडीने पुनर्विचार करावा.

-दयाशंकर तिवारी, नागपूर भाजप अध्यक्ष

संपादकीय लेखणीतून...

## संकटग्रस्त वन्य प्राणी आणि वनस्पती

मानवी अस्तित्व उत्क्रांतीच्या प्रवाहात आणि निसर्गाच्या कक्षेत उभे राहत असताना वन्यजीव संपदेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. याची जाणीव आगामी काळात तेवढीच सुस्पष्ट असावी या हेतूने जगभर जागतिक वन्यप्राणी दिन म्हणून साजरा केला जातो. १९७३ च्या जागतिक संकटग्रस्त वन्य प्राणी आणि वनस्पतीच्या आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधी परिषदेतील ठरावास संयुक्त राष्ट्रांनी स्वाक्षरी केल्याची आठवण म्हणून वर्ष २०१३ पासून वन्यप्राण्यांच्या रक्षणासाठी कटिबद्धतेचे प्रतीक म्हणून जागतिक पातळीवर वन्यप्राणी दिन साजरा केला जातो. या निमित्ताने मानव वन्यजीव संघर्षांची किनार काही भागात गडद असताना नैसर्गिक परिसंस्थेच्या समतोल विकासासाठी संवर्धनाचे उपाययोजनाचे चिंतन केल्या जाते. वन्यजीव संरक्षणासाठी भागीदारी ही २०२३ यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना आहे. विविध कारणांनी मानवाकडून नैसर्गिक परिसंस्थेस हानी पोचविल्या जात आहे, ज्यामुळे वन्यजीव संपदा (प्राण्यांचे आणि वनस्पतीचे) अस्तित्व धोक्यात येत आहे. जागतिक निसर्ग संरक्षण संघटनेने नोंदविलेल्या निरीक्षणानुसार आजमितीला सुमारे ८ हजार ४०० वन्यजीव प्रजाती या धोक्याच्या पातळीवर आहेत तर सुमारे ३० हजार प्रजाती संकटग्रस्त होण्याच्या मार्गावर आहेत. निसगार्चा समतोल हा केवळ वन्यजीवांसाठी गरजेचा नसून मानवी अस्तित्वासाठी देखील महत्वाचा ठरतो म्हणून वन्यजीव संपदेचे संवर्धन समजून घेणे आवश्यक आहे.

भारत हा एक खंडप्राय देश असून देशाच्या भौगोलिक वैविध्यतेमुळे आढळणाऱ्या वन्यजीव संपदा प्रजातींमध्ये विविधता आढळून येते. क्षेत्रफळाच्या दृष्टीने २.४ टक्के भूभाग असलेल्या आपल्या देशात जगाच्या एकूण वन्यजीव संपदेच्या ८ टक्के वन्यजीव अधिवास करतात. उत्तरेस हिमालयापासून ते दक्षिणेस हिंद महासागरपर्यंत विविध वन्य प्राणी आणि वनस्पति निपजल्या गेल्या आहेत. वेगवेगळ्या भूप्रदेशातील माती, पाणी, हवामान आणि लोकजीवन इत्यादि घटकांचा परिणाम स्थानिक जीवसृष्टीवर होत असतो. भारतीय जैवविविधता पाहता, हिमालय, पश्चिम घाट, अंदमान निकोबार बेटे, सुंदरबन सारखे भूभाग जागतिक पातळीवर अत्यंत महत्वाचे आहेत. जगातील जैविक विविधता संपन्न अशा प्रमुख १७ देशात भारताचा अग्रक्रम असून ११ बायोस्पीयर रिजर्व आणि २६ रामसार (पाणथळ) स्थळे आहेत. वन्यजीव प्रजातींचे वैविध्य पहिले तर, भारतात सुमारे ४०० सस्तन प्राणी, २०६० पक्षी, ३५० सरीसरूप प्राणी, २१६ उभयचर आणि ३० लाख कीटकवर्ग नोंदल्या गेले आहेत. काळवीट, सोनेरी माकड (कपी), सिंहपृच्छ वानर, पिग्मि होग सारखे प्राणी जगाच्या पाठीवर केवळ भारतातच आढळतात. एकट्या हरिण वगार्चा विचार केल्यास ९ विविध प्रकारचे हरणाच्या प्रजाती (कस्तुरी, कोटरा, चितळ, बारसिंगा, सांबर, होगहिरण, थमिन, हंगल, संगई) आपणास दिसतात. जंगली कुत्रे, रानम्हशी, गवे, हत्ती, गेंडे, सिंह आणि वाघ हे भारतीय वन्यप्राणी जगभरातील वन्यजीवप्रेमी आणि अभ्यासकांचा आकर्षणचा विषय आहेत. भारताला जगाच्या पाठीवर निसर्गसंपन्न असे राष्ट्र म्हणून ओळख मिळवून देणाऱ्या या वन्यजीव संपदेचे संरक्षण करणे म्हणूनच महत्वाचे आहे. भारतीय वन्यजीव संपदा संरक्षित ठेवणे हे प्रत्येक भारतीयाचे नैतिक कर्तव्य आहे. बंगाली वाघ- राष्ट्रीय वन्यप्राणी, मोर- राष्ट्रीय पक्षी, गंगेतील डॉल्फिन- राष्ट्रीय जलचर प्राणी तर हत्ती-राष्ट्रीय वारसा प्राणी आहे.

मानवी वसाहत मूलतः जंगलाच्या कुशीत आणि वन्यजीवांच्या सहचर्यात सुरू झालेली असल्याने आजही अनेक आदिवासी मानवी वसाहती खाद्य, इंधन, औषधी, निवारा इत्यादि अनेक बाबींच्या गरजेपोटी जंगलांच्या सान्निध्यात आहेत. त्यांची उपजीविका आणि आर्थिक संधी जंगलापासून उपजलेल्या विविध वस्तूंवर अवलंबून असल्याने माणूस व वन्यजीवांचा संघर्ष अनेकदा बघायला मिळतो. अनेक दुर्मिळ वन्यजीव प्राण्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत बेकायदेशीर छुप्या पद्धतीने तस्करी करून पैसे कमविण्याच्या खटाटोपात वन्यजीवांची शिकार केल्या जाते. जंगलालगतच्या शेती असणाऱ्या पशूपालकांना अधिवास, अन्न, निवारा या बाबीसाठी शोधत असणाऱ्या वन्य प्राण्यांकडून होणारी पिकांची नासाडी, पशुधनाची शिकार वगैरे समस्यांना तोंड द्यावे लागते. वन्यजीवांना असणाऱ्या बहुतांश धोक्यांमध्ये त्यांचे नैसर्गिक अधिवास अवैध जंगलतोडीने नष्ट होणे यासह कातडी, नखे, सुळे वगैरे हस्तगत करण्यासाठी होणारी शिकार, विषबाधा, रस्ते अपघात यांसारखे मानवनिर्मित धोके मोठ्या प्रमाणावर असतात. दुर्गम व जंगल क्षेत्रात विकासकामांच्या रूपाने होणारे धरणे, महामार्ग बांधणी, सारख्या बाबींमुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक परीक्षेत्रात मानवी वावर मोठ्या प्रमाणात वन्यजीवांना त्रासदायक ठरतो. याशिवाय वणवा, प्रदूषण, मानव आणि पशुतील सामायिकपणे संक्रमीत होणारे संसर्गजन्य रोग, वातावरणातील बदल इत्यादि घटक वन्यजीव संपदेस धोकादायक आहेत.

# सिंधू जल करारावर हेग लवादाचा निकाल भारताने फेटाळला

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांमध्ये सिंधू जल करार हा नेहमीच अत्यंत संवेदनशील आणि कळीचा मुद्दा राहिला आहे. नुकतेच हेग येथे असलेल्या आंतरराष्ट्रीय लवादाने या करारासंदर्भात पाकिस्तानच्या बाजूने निकाल दिला आहे. या निकालामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा राजनैतिक हालचालींना वेग आला असून, अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानला यामुळे नवा हुरूप आला आहे. मात्र, भारताने अत्यंत आक्रमक आणि स्पष्ट भूमिका घेत हा निकाल केवळ फेटाळलाच नाही, तर या लवादाच्या वैधतेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या संपूर्ण घटनाक्रमाचे राजकीय, कायदेशीर आणि धोरणात्मक विश्लेषण करणे गरजेचे आहे.

हेग येथील लवादाने आपल्या निर्णयात असे नमूद केले आहे की, सिंधू पाणी वाटप करार लागू राहील आणि भारताला या करारांतर्गत आपल्या जबाबदाऱ्यांचे पालन करावे लागेल. हा निर्णय येताच पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने तातडीने त्याचे स्वागत केले. या निमित्ताने पाकिस्तानच्या माजी परराष्ट्र मंत्री हिना रब्बानी खार यांनी भारताविरोधात गरळ ओकण्यास सुरुवात केली. त्यांनी या निकालाचे भांडवल करत भारतावर आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला. सिंधू जल करार स्थगित करणे हा भारताचा मनमानी कारभार असून, हा निर्णय कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्यासमोर किंवा न्यायालयात टिकणार नाही. कोणत्याही देशाने अशी गोष्ट लाजिरवाणी मानून आपल्या धोरणात सुधारणा करण्याचा विचार करायला हवा, अशा शब्दांत त्यांनी भारताला लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचा हा उत्साह म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यासपीठाचा वापर करून भारताविरुद्ध अपप्रचार करण्याची त्यांची जुनीच रणनीती असल्याचे यातून स्पष्ट होते.

**भारताची कायदेशीर भूमिका आणि लवादाला नकार**

पाकिस्तानच्या या थयथयाटाला भारताने अत्यंत सडेतोड आणि मुत्सद्दी उत्तर दिले आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हेग येथील 'कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन'चा निकाल पूर्णपणे धुडकावून लावला. भारताची यामागील भूमिका अत्यंत स्पष्ट आणि कायदेशीर पायावर उभी आहे. जागतिक बँकेच्या पुढाकाराने स्थापन झालेला हा लवादच मुळात बेकायदेशीर असल्याचे भारताचे म्हणणे आहे. भारताच्या मते, मध्यस्थता करणाऱ्या या एजन्सीला आणि त्यांच्या लवादाला भारताने घेतलेल्या सार्वभौम निर्णयांवर सुनावणी करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. या लवादाची स्थापना आणि कार्यपद्धती या दोन्ही गोष्टींना भारताने सुरुवातीपासूनच विरोध दर्शवला आहे. त्यामुळे एका बेकायदेशीर प्रक्रियेतून आलेला निकाल मान्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, हे भारताने जगाला ठणकावून सांगितले आहे.

भारताने सिंधू जल कराराबाबत घेतलेली ही कठोर भूमिका एकाएकी आलेली नाही, तर त्यामागे पाकिस्तानचा सातत्याने चालत आलेला दहशतवादाचा खेळ कारणीभूत आहे. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे एक अत्यंत भीषण आणि भ्याड दहशतवादी हल्ला झाला होता, ज्यामध्ये २६ निष्पाप भारतीय पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले. या घटनेनंतर भारताचा संयम सुटला. 'दहशतवाद आणि चर्चा (किंवा पाणीवाटप) या गोष्टी एकाच वेळी चालू शकत नाहीत', हे सूत्र भारताने अवलंबले आणि त्याचाच एक भाग म्हणून भारताने सिंधू जल करार स्थगित करण्याचा ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतला. भारताने स्पष्ट संदेश दिला की, जो देश सीमेपलीकडून दहशतवाद पोसतो, त्याला द्विपक्षीय करारांचे फायदे उपभोगण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरत नाही.

आंतरराष्ट्रीय लवादाचा निकाल कागदावर पाकिस्तानच्या बाजूने लागला असला, तरी वास्तवात जमिनीवरची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. सिंधू जल करार स्थगित करण्याच्या भारताच्या निर्णयाचे गंभीर परिणाम आता पाकिस्तानमध्ये दिसू लागले आहेत. पाकिस्तानची बहुतांश कृषी व्यवस्था आणि अर्थव्यवस्था याच नद्यांच्या पाण्यावर अवलंबून आहे. भारताने पाण्याचे नियोजन आणि नियंत्रण कठोर केल्यामुळे पाकिस्तान सध्या पाण्याच्या एका-एका थेंबाला तरसत असल्याची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. एकीकडे आंतरराष्ट्रीय न्यायालयात विजयाचे दावे करायचे आणि दुसरीकडे देशांतर्गत पातळीवर पाण्यासाठी संघर्ष करायचा, अशी दुटप्पी आणि केविलवाणी अवस्था सध्या पाकिस्तानची झाली आहे.

हेगच्या लवादाचा निकाल हा पाकिस्तानसाठी केवळ एक तात्पुरता भावनिक दिलासा आहे. भारताने या लवादाची मान्यताच नाकारल्याने या निकालाची अंमलबजावणी होणे जवळपास अशक्य आहे. हिना रब्बानी खार यांसारख्या नेत्यांची विधाने केवळ देशांतर्गत राजकारणासाठी आणि जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी केलेली धडपड आहे. भारताने मात्र आपल्या राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत, पाण्याचा वापर एक प्रभावी सामरिक हत्यार म्हणून यशस्वीरीत्या करण्यास सुरुवात केली आहे. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला जोपर्यंत धडा मिळत नाही, तोपर्यंत भारताची हीच अभेद्य आणि आक्रमक भूमिका कायम राहील, हे या संपूर्ण घटनाक्रमावरून स्पष्ट होते.

– ९५६१५९४३०६

## हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार



२९ ऑगस्ट १९०५ मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रूपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.

मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत १९२८, १९३२, १९३६अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले. यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे. यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते. याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे.

आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे. भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले. त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात. त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.

याचाच आनंद देशातील १४५ कोटी जनता नेहमी घेत असते.आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते.याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे. कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.१९३५ साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.

१९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता.जर्मनी विरूद्ध भारत असा सामना होत असतांना भारताने जर्मनीचा ८ विरूद्ध १ गोलनी दनदणीत पराभव केला.हा खेळ पाहुण हिटलर आश्चर्य चकित झाले.खेळ संपल्यानंतर हिटलरने मेजर ध्यानचंद यांना भेटीचे निमंत्रण दिले.या भेटीमध्ये हिटलरने मेजर ध्यानचंद यांचे खुप कौतुक केले व त्यांच्या खेळण्याची जादु पाहून जर्मनी सैन्यात मोठे पद देण्याची कबुल केले.परंतु मेजर ध्यानचंद यांचे राष्ट्रप्रेम सर्वोपरी होते.त्यामुळे मेजर ध्यानचंद यांनी हिटलरची ऑफर नाकारली व त्यांनी हिटलरला सांगितले की माज्यासाठी माझी मातृभुमि महान.१९२८ ते १९६४ हे युग भारतीय हॉकीसाठी सुवर्ण युग मानल्या जाते.कारण या काळात आठ ऑलिंपिकमध्ये सात सुवर्ण पदक मिळाले होते हा भारतासाठी गौरवशाली इतिहास आहे.

काही दिवसांपूर्वी महिला कुस्तीपटूंवर मोठा अन्याय झाला होता व न्याय मिळावा यासाठी खेळाडूंना रस्त्यावर यावे लागले ही चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बान-शान आहे.त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच.तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल.

देशातील संपूर्ण तळागाळातील खेळाडूंना विनंती करतो की देशातील वाढते बदलते हवामान, वाढते तापमान, वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेली ऑक्सिजनची मात्रा पहाता आज वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण खेळाडूंनी, सरकारनी, शाळा-महाविद्यालय व स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे असे मला वाटते.कारण आज लावलेले वृक्ष अनंत काळापर्यंत जिवित राहिल व २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम.

**– रमेश लांजेवार, नागपूर**
**९९२१६९०७७९**

# पाकिस्तान क्रिकेटचा नवा खेळ आणि गोंधळाचा कळस – बुडत्याचे पाय डोहात!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

मिर्झा गालिब यांचा एक प्रसिद्ध शेर आहे. "होता है शब-ओ-रोज तमाशा मेरे आगे..." पाकिस्तान क्रिकेटची सध्याची अवस्था पाहता हा शेर तंतोतंत लागू पडतो. गालिब आज हयात असते, तर त्यांनी पाकिस्तान क्रिकेटच्या या अनाकलनीय कारभारावर एखादा स्वतंत्र काव्यसंग्रहच लिहिला असता. मैदानावरील कामगिरीपेक्षा मैदानाबाहेरील नाट्य, विसंगती आणि हास्यास्पद निर्णयांमुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड पुन्हा एकदा जगभरात चर्चेचा आणि टीकेचा विषय बनले आहे.

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या पाकिस्तान संघाने हेडिंग्ले आणि लॉर्ड्स येथील पहिले दोन कसोटी सामने गमावले. पराभवानंतर आत्मपरीक्षण होणे स्वाभाविक असते; पण पीसीबीने मालिका संपण्याचीही वाट पाहिली नाही. तिसऱ्या कसोटीपूर्वीच अचानक संपूर्ण संघ व्यवस्थापनात केलेली उलथापालथ क्रिकेट विश्वाला थक्क करून सोडणारी आहे.

**दौऱ्याच्या मध्यातच सात खेळाडूंची गच्छंती आणि नवीन एन्ट्री**

मालिकेचा तिसरा व अंतिम सामना एजबॅस्टन येथे खेळवला ९ सप्टेंबर पासून खेळला जाणार असताना, पीसीबीने तडकाफडकी सात खेळाडूंना मायदेशी परत बोलावले आणि त्यांच्या जागी पाकिस्तानातून सात नव्या खेळाडूंना थेट इंग्लंडला रवाना केले.

**टी-२० कर्णधाराचाच अपमानः-** मायदेशी परत पाठवलेल्या खेळाडूंमध्ये इमाम-उल-हकसोबत सलमान अली आगा याचाही समावेश आहे. हेडिंग्ले कसोटीत बाबर आझम दुखापतग्रस्त असल्याने ज्या सलमान अली आगा याच्याकडे कर्णधारपद सोपवले गेले, त्यालच लॉर्ड्स कसोटीत खराब फॉर्ममुळे वगळले गेले आणि आता थेट दौऱ्यावरूनच हाकलून देण्यात आले. देशाचा टी-२० कर्णधार असलेल्या खेळाडूला अशा प्रकारे वागणूक देणे हा निव्वळ पोरखेळ मानला जात आहे.

**कसोटी संघात मर्यादित षटकांचे खेळाडूः** – नव्या सात खेळाडूंमध्ये कसोटीचा अनुभव नसलेल्या पांढऱ्या चेंडूच्या खेळाडूंना प्राधान्य दिले गेले आहे. सॅम अयुब आणि अराफात मिन्हास यांच्यासारख्या मर्यादित षटकांच्या तज्ज्ञांना थेट कसोटी संघात ढकलण्यात आले आहे. हेडिंग्लेमध्ये पाच बळी घेणारा डावखुरा फिरकीपटू अली उस्मान मायदेशी परतत असताना, त्याच्याच जागी अराफात मिन्हासला पाठवण्याचा निर्णय कोणाच्याही पचनी पडणारा नाही. स्थानिक क्रिकेटमध्ये १४ व्या क्रमांकावर असलेल्या गोलंदाजांना अचानक कसोटीचे तिकीट मिळणे निव्वळ नशिबाचा भाग ठरले आहे.

**प्रशिक्षकांची हकालपट्टी आणि माइक हेसन यांच्याकडे सूत्रे**

खेळाडूंव्यतिरिक्त पीसीबीने थेट कोचिंग स्टाफवरच कुऱ्हाड चालवली. कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक सरफराज अहमद आणि गोलंदाजी प्रशिक्षक उमर गुल यांना तडकाफडकी पदावरून हटवण्यात आले. त्यांच्या जागी मर्यादित षटकांचे मुख्य प्रशिक्षक माइक हेसन आणि गोलंदाजी प्रशिक्षक अँक्षे नोफ्के यांना इंग्लंडला पाठवून सूत्रे सोपवण्यात आली आहेत. माइक हेसन आता केवळ एजबॅस्टन कसोटीतच नव्हे, तर आगामी न्यूझीलंड आणि श्रीलंका कसोटी मालिकेतही संघाची धुरा सांभाळतील.

**क्रिकेट विश्वातून तीव्र संताप**

दौरा सुरू असतानाच घेतलेल्या या घाईगडबडीच्या निर्णयांवर माजी खेळाडूंनी कडाडून टीका केली आहेः

रमीझ राजाः "सर्व काही ठीक आहे हे स्वतःला पटवून देण्याचा मी प्रयत्न करतोय, पण तसे नाही. पीसीबीने अत्यंत घाबरून हे पाऊल उचलले आहे. यामुळे संघात आलेल्या आणि संघात राहिलेल्या अशा दोन्ही खेळाडूंचे मनोधैर्य खचले आहे."

राशीद लतीफः "ज्यांनी हा संघ निवडला होता, तेच आता संघाला शिक्षा करत आहेत. आज तुम्ही इतरांचा अपमान करत असाल, तर उद्या हे चक्र तुमच्यावरही उलटणार आहे."

मिकी आर्थरः "खेळाडू, प्रशिक्षक आणि निवडकर्ते वारंवार बदलत राहिल्यामुळेच ही परिस्थिती ओढवली आहे. इथे कोणताही स्थैर्य राहिलेले नाही."

**निवड समितीतील अंतर्गत कलह आणि मिस्बाहचा राजीनामा**

या सगळ्या नाट्यादरम्यान निवड समितीचे सदस्य आणि माजी कर्णधार मिस्बाह-उल-हक यांनी ईमेलद्वारे आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. निवड समितीत आकिब जावेद, असद शफिक आणि सरफराज अहमद यांचा समावेश असला, तरी सध्या सर्व अधिकार आणि निर्णय केवळ आकिब जावेद यांच्या हातात केंद्रित झाल्याचे उघड झाले आहे. पीसीबीच्या अंतर्गत राजकारणामुळे संतप्त होऊन मिस्बाह यांनी बाहेर पडणे पसंत केले. मालिकेचा निकाल काहीही लागो, मालिका संपल्यानंतर एका सर्वसमावेशक आढावा बैठकीत कठोर निर्णय घेणे ही व्यावसायिक पद्धत असते. मात्र, चालू दौऱ्यात खेळाडूंची पळापळ करून आणि प्रशिक्षकांना हटवून पीसीबीने आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. त्यामुळेच पाकिस्तान क्रिकेटचे मैदान सध्या खेळापेक्षा एका अनपेक्षित नाटकाचा रंगमंच अधिक वाटत आहे.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# हजारो विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरणपूरक 'गणपती बाप्पा'

## मनपाच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेला उदंड प्रतिसाद, 'गणपती बाप्पा मोरया'च्या जय घोषाने दुमदुमले परिसर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने मनपासह इतर शाळांच्या हजारो विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला अन् सुप्त कलागुणांना वाव देत शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक असे गणपती बाप्पा साकारले, पहिल्यांदाच जवळपास ५ हजार विद्यार्थांनी आपल्या चिमुकल्या हातांनी श्री गणरायांची मूर्ती घडविली. महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात मनपाद्वारे गुरूवारी (ता.०३) रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यासोबतच यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीनेच साजरा करणार असल्याची ग्वाही विद्यार्थ्यांनी दिली.

कार्यशाळेला स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्ष नेते संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लड्ढा, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनिषा अतकरे, उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी गजेंद्र महल्ले, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, स्वच्छ भारत मिशन नागपूरच्या ब्रँड अँबेसिडर व तेजस्विनी महिला मंचच्या प्रमुख किरण मुंदडा यांनी उपस्थित राहून विद्यार्थांच्या उत्साह वाढविला. विशेष म्हणजे, महापौर निता ठाकरे यांनी श्री गणेशमूतीर्ला घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. तर मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी विद्यार्थ्यांसह सेल्फी घेत त्यांच्या आनंद द्विगुणित केला. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जय घोषात कार्यशाळेला प्रारंभ झाला.



कार्यशाळेत मनपाच्या ५६ शाळेतील विद्यार्थ्यांनी तर शहरातील विविध २० शाळेतील विद्यार्थ्यांनी अशा एकूण ७६ शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मनपाने पुढाकार घेतला आहे, यामाध्यमातून विद्यार्थ्यांना शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. महापौरांनी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या उत्साहपूर्ण सहभागासाठी त्यांचे कौतुक केले. तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यास मदत मिळावी याकरीत अशा कार्यशाळांचे आयोजन महत्त्वाचे ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. तर आयुक्त डॉ. विपीन यांनी महाराष्ट्रभर गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत असल्याचे सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की, महानगरपालिकेने यावेळी इको-फ्रेंडली मूर्तींना बनवण्यासाठी आणि स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन द्यायचा निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेच्या पोर्टलच्या माध्यमातून इच्छुक नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग नोंदविल्याचे ही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी तर आभार मुख्य स्वच्छता अधिकारी गजेंद्र महल्ले यांनी व्यक्त केले.

**विविध मूर्तींनी वेधले लक्ष**

कार्यशाळेत प्रशिक्षक नाना मिसळ, गौरव सावरकर, निशांत कवडते, पास्थणकर यांच्यासह शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांना मूर्ती साकारण्यास मदत केली. कार्यशाळेत प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने शाडूच्या मातीपासून गणपती मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले, त्याचे अनुकरण करत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेनुसार आकर्षक अशा मूर्ती तयार केल्या. याकरिता विद्यार्थांना शाडूची माती व कलाकृतीचे साहित्य प्रदान करण्यात आले.

श्रीगणेशाच्या विविध मूर्तीचे विद्यार्थ्यांनी बनविल्या ज्यात ज्योतिबा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कल्पकतेने बनवलेल्या नागपूरच्या प्रसिद्ध श्री टेकडी गणपतीची प्रतिकृती लक्ष्यवेधी ठरली, मूषकस्वार श्रीगणेश, दैत्य मर्दन करतांना अशी मूर्ती काही विद्यार्थ्यांनी साकारली, तसेच मयूरावर स्वार श्री गणेश, सिंहासनावर विराजित अशा अनेक मूर्तींनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात आणि आनंदात श्रीगणेश मूर्ती बनविल्या, अनेक विद्यार्थ्यांनी बनवलेल्या मूर्तींना घरी नेले असून, उर्वरित मूर्तींना मनपाद्वारे अधिकाऱ्यांना स्थापन करण्यासाठी दिले जाणार असून, इच्छुक नागरिकांनाही स्थापन करण्याकरिता देण्यात येणार असल्याचेही उपायुक्त यांनी सांगितले.

थोडक्यात

## श्री क्षेत्र बल्याची पहाडी (झिरी देवस्थान) विकासासाठी २ कोटी रुपये मंजूर

### माजी भाजपा मौदा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल यांच्या सतत पाठपुराव्याला यश

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

खात-रेवराल जिल्हा परिषद क्षेत्र व अदासा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या 'श्री क्षेत्र बल्याची पहाडी, निहारवाणी (झिरी देवस्थान)' या 'ब' वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना' अंतर्गत २ कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. यासंदभार्तील प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय नुकताच निर्गमित झाला आहे. या निधीतून मंदिर परिसरात भाविकांच्या सोयीसाठी भव्य सभागृह, किचन, आधुनिक प्रसाधनगृह, बी.टी. रस्ता, वाहनतळ, विद्युतीकरण, जलव्यवस्थापन व लँडस्केपिंगची कामे केली जाणार आहेत. या महत्त्वपूर्ण मंजुरीबद्दल भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष व माजी पंचायत समिती सदस्य मुकेश अग्रवाल यांनी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सतत पाठपुरावा केला होता, हे विशेष!



दोन कोटी रुपयांच्या विकास निधी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंजूर केल्याबद्दल माजी भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल, खात - रेवराल जिल्हा परिषदेच्या माजी जिल्हा परिषद सदस्या राधा मुकेश अग्रवाल सह मौदा तालुक्यातील व तीर्थक्षेत्र परिसरातील भाविकांनी व नागरीकांनी आभार व्यक्त केले असून, या विकासकामांमुळे भाविकांना उत्तम सोयी-सुविधा उपलब्ध होऊन परिसराच्या पर्यटनालाही चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## उमरेड विधानसभा क्षेत्रात १० हजार वृक्ष लागवडीचा सुधीर पारवेंचा संकल्प!

### चनोडा येथे ५०० वृक्षांचे रोपण, वृक्षदिंडीने दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश!

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

पर्यावरण संवर्धन आणि हरित भविष्याचा संदेश देत उमरेड विधानसभा क्षेत्रातील विविध गावांमध्ये १० हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प माजी आमदार सुधीर पारवे यांनी केला आहे. या उपक्रमाची सुरुवात बुधवारी (दि. २) चनोडा येथे करण्यात आली. यावेळी गावातून वृक्षदिंडी काढण्यात आली आणि ५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. सुधीर पारवे फाउंडेशन व लक्ष्मणा बहुउद्देशीय संस्था, भिवापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक पेड, माँ के नाम' या संकल्पनेखाली हा उपक्रम राबविण्यात आला. वृक्षदिंडीमध्ये विद्यार्थी, ग्रामस्थ, महिला, विविध भजन मंडळे, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.



कार्यक्रमाला जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कानिफनाथ कलोंडे, खंडविकास अधिकारी विजय झिंगरे, बेला पोलीस निरीक्षक उमेश नासरे यांच्यासह विविध गावांतील सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते. वाढते प्रदूषण आणि बदलते हवामान लक्षात घेता वृक्ष लागवडीसोबतच लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. उमरेड विधानसभा क्षेत्रातील १० हजार वृक्षांचा संकल्प पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## अहिल्या किड्स प्री-स्कूलमध्ये जन्माष्टमी उत्साहात साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, भोसलेवाडी, हिंगणा**


सरदार मल्हार होळकर बहुउद्देशीय शिक्षण संस्था अंतर्गत अहिल्या किड्स प्री स्कूल, भोसलेवाडी, हिंगणा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाची आकर्षक वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. राधा-कृष्णाच्या वेशातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध उपक्रमांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चिमुकल्यांनी मोठ्या उत्साहाने दहीहंडी उत्सवात सहभाग घेतला. या कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव चंद्रकला उरकुडे, तसेच संस्थेच्या सदस्य प्रीती धोटे व सुनीता चतुर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, धैर्य, सदाचार व कर्मनिष्ठेचे महत्त्व सांगितले. बालवयातच विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व सण- उत्सवांची ओळख व्हावी, या उद्देशाने अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्री- स्कूलच्या प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण कृष्णमय झाले होते.

## चिंधबाजी नागोजी बावणकुळे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खसाळा (मसाळा) येथील ज्येष्ठ नागरिक चिंधबाजी नागोजी बावणकुळे (वय ९६) यांचे गुरुवारी दुपारी ३ वाजता दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पाच बहिणी, आई, सून, नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता खसाळा मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार होणार आहे.



## विवेक रोकडे यांचा पदोन्नतीबद्दल सत्कार, नारोबा-बारोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

विवेक पांडुरंग रोकडे यांची कार्यकारी संचालक (प्रकल्प) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी व अभियंता सेना संघटनेतर्फे गुरुवारी ३ सप्टेंबर रोजी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील ५०० मेगावॅट परिसरातील नारोबा-बारोबा मंदिरात रोकडे यांच्या हस्ते विधिवत पूजा-अर्चना करण्यात आली. पूजेनंतर रोकडे यांनी मंदिर व परिसराची पाहणी केली. यावेळी मंदिर परिसराच्या सौंदर्यीकरणाबाबत तसेच आवश्यक विकासकामांची माहिती त्यांनी घेतली. मंदिर परिसराच्या विकासासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यानंतर महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी व अभियंता सेना संघटनेतर्फे 'झाडे लावा, झाडे जगवा झ पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा' या संकल्पनेतून नारोबा-बारोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रोकडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



याप्रसंगी देखभाल नियोजन विभागचे प्रमुख अधीक्षक अभियंता श्री. शुक्ला यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्या हस्तेही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. विवेक रोकडे हे खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत असताना त्यांनी खापरखेडा येथील आझाद मैदान परिसरात सुमारे १५० ते २०० औषधी वनस्पतींची लागवड करण्याचा अभिनव उपक्रम राबविला होता. या ठिकाणीही त्यांनी भेट देऊन यापूर्वी लागवड केलेल्या झाडांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. त्यांच्या कार्यकाळात खापरखेडा परिसरात सुमारे २ हजार ते ३ हजार वृक्षांची लागवड करण्यात आल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. या कार्यक्रमास संघटनेचे कंत्राटी अध्यक्ष रमेशजी गणोरकर, केंद्रीय सहकार्याध्यक्ष (निर्मिती) मानकर, केंद्रीय उपसरचिटणीस (निर्मिती) विजय शास्त्रकार, खापरखेडा झोन अध्यक्ष के.पी. राठोड, झोन सचिव महेश बिराजदार, झोन कार्याध्यक्ष तेजस सोनवणे, अजय सोनकुसरे, नरेश तरारे, सिव्हिल विभागाचे सहाय्यक अभियंता धामणे यांच्यासह सिव्हिल विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी रोकडे यांनी संघटनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धन ही सामूहिक जबाबदारी असून अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## डॉ.निरजा बांगरे वाघ यांना प्रतिष्ठित प्रथम स्वर योगिनी डॉ.प्रभा अत्रे संगीत शोध पुरस्कार जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** नागपुरातील ज्येष्ठ संगीत साहित्यकार व मार्गदर्शक डॉ.अरुण बांगरे यांची कन्या व शिष्या डॉ. निरजा बांगरे वाघ यांना प्रतिष्ठित प्रथम स्वर योगिनी डॉ. प्रभा अत्रे "संगीत शोध पुरस्कार" त्यांनी केलेल्या "उत्तर हिंदुस्तानी संगीत में स्वरलिपी पद्धती की भूमिका एवं विकास" या शोध प्रबंधासाठी जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील विश्वव्याख्यात गायिका स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशन तर्फे जाहीर झाला आहे. या पुरस्काराची घोषणा फाउंडेशन सचिव डॉ. भारती एम. डी. आणि ज्येष्ठ गायक आणि पुरस्कारासाठी परीक्षक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विकास कशाळकर यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत केली. हा पुरस्कार ६ सप्टेंबर रविवारी, प्रख्यात ध्रुपद गायक, संशोधक, शिक्षण तज्ज्ञ, पद्मश्री व संगीत नाटक अकादमी पुरस्कारार्थी डॉ. ऋत्विक सान्याल यांच्या शुभहस्ते पुणे येथील गणेश सभागृह, टिळक रोड येथे भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात येईल.



या पुरस्कार प्राप्तीचे श्रेय डॉ. नीरजा बांगरे वाघ यांनी त्यांचे वडील व प्रथम गुरु डॉ. अरुण बांगरे व आई आसावरी बांगरे आणि त्यांच्या मार्गदर्शक डॉ. साधना शिलेदार - संगीत विभाग प्रमुख , वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था यांना दिले आहे. हा प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त करणाऱ्या डॉ. नीरजा बांगरे वाघ या विदर्भातील प्रथम शोधकर्त्या आहेत. या पुरस्कारामुळे संगीत साहित्याला व संशोधनाला अधिक चालना मिळेल. डॉ. नीरजा बांगरे वाघ गेल्या १५ वर्षांपासून हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत गायन व शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्थेत संगीत प्राध्यापक आहेत. तसेच भवन्स कला सृजन मध्ये संगीत शिक्षणाचे कार्य करीत आहेत.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून पोलिस प्रशासनाला रेनकोटचे वाटप

### मुसळधार पावसात कर्तव्य बजावणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी सामाजिक उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मान्सूनच्या काळात प्रतिकूल हवामानाची पर्वा न करता जनतेच्या सुरक्षेसाठी अहोरात्र सेवा बजावणाऱ्या महाराष्ट्र पोलिस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेने सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेतला आहे. बँकेच्या विपणन आणि विकास निधीअंतर्गत पोलिस कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले.



नागपूर येथील पोलिस आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक भागवत माळगे तसेच पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रेनकोट वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. मुसळधार पावसातही कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस कर्मचारी रस्त्यावर कर्तव्य बजावत असतात. अशा परिस्थितीत त्यांना रेनकोट उपलब्ध करून देणे, तसेच विपणन व विकास निधीचा उपयोग करून समाजाचे रक्षण करणाऱ्या यंत्रणेला सहकार्य करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले. या उपक्रमामुळे महाराष्ट्र ग्रामीण बँकेची सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक प्रतिमा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

यावेळी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक भागवत माळगे म्हणाले, महाराष्ट्र पोलिस दल हे २४ तास जनतेच्या सेवेत तत्पर असते. पावसातही निष्ठेने कर्तव्य बजावणाऱ्या या रक्षकांच्या आरोग्याची व सुरक्षेची काळजी घेणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. त्यांना मदत करताना महाराष्ट्र ग्रामीण बँकेला सार्थ अभिमान वाटतो. या उपक्रमाबद्दल उपस्थित वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मनापासून आभार मानले. पोलिस कर्मचारी कर्तव्य बजावत असताना हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अधिकारी, स्थानिक शाखा व्यवस्थापक तसेच पोलिस दलातील अधिकारी उपस्थित होते.

## शिक्षक दिनी राज्यातील ४२ शिक्षकांना 'कर्तृत्ववान शिक्षक पुरस्कार' जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील शिक्षकांचे व्यासपीठ असलेले शिक्षक ध्येय, साई समर्पण संकल्प, नांदेड; श्री. विलास नामदेवराव व्हटकर, मुंबई, यशिता गार्डन नर्सरी, हिंगणघाट, जिल्हा वर्धा आणि आई कनकाई सामाजिक संस्था, होडगांव (कोंड), ता. माणगांव जि. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त राज्यातील शिक्षकांसाठी 'कर्तृत्ववान शिक्षक पुरस्कारा'साठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण उपक्रम स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. या स्पधेर्मागे शिक्षकांच्या कामाला प्रोत्साहन देणे हाच मुख्य उद्देश होता.

राज्यातील शिक्षकांमधून दोन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. प्राथमिक गटात (अंगणवाडी ते सातवी) २८ आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात (आठवी ते पदवीपर्यंत) १४ असे एकूण ४२ विजेत्या शिक्षिका, शिक्षकांची निवड करण्यात आली.

शिक्षक ध्येय
विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

**कर्तृत्ववान शिक्षक पुरस्कार विजेते**

प्राथमिक गटात आनंद हिरालाल जाधव, बिदर, कर्नाटक; योगिता मधुकरराव भुसारी, अमरावती; राजु बापूराव नागरगोजे, लातूर; निलेश शिवाजीराव पवार, नंदुरबार; सोनिया सतिश राव, मुंबई; कविता अमोल खासबागे, अमरावती; मीना विजय सोनकुसळे, अमरावती; श्रावण कारभारी सोनवणे, नाशिक; उदय शिवराम साळवी, ठाणे; रेखा दत्तू ताम्हणे, जळगांव; समाधान शिवाजी वानोळे, यवतमाळ; रविंद्र भटू अहिरराव, नंदुरबार; अन्नपूर्णा शंकरराव सुवर्णकार, यवतमाळ; अनूप कुलकर्णी, नाशिक; सोनाली संदिप धोटे, अमरावती; दिलीप बान्या पवार, नंदुरबार; शरणप्पा भीमराय फुलारी, सोलापूर; उमा भाऊराव पाटील, छत्रपती संभाजीनगर; विनय विष्णू राणे, रत्नागिरी; कैलास किसनराव तुपे, बीड; हेमलता भगवान आखाडे, गडचिरोली; जगदिश सिताराम महाजन, जळगांव; शितल एकनाथराव सोनवणे, जळगांव; सखाराम अंकुलू झोडे, गडचिरोली; समय्या लचन्ना सद्दी, गडचिरोली; दुंडण्णा मादन्ना कोळी, सोलापूर; निर्मला दिलीपराव नंदूरकर, वर्धा; डॉ. फकीरा भगवान राजगुरू, बुलढाणा आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात डॉ. इस्माईल महाबुब गुलाब पठाण, कोल्हापूर; डॉ. उदय अनंत माळगांवकर, कल्याण; पुष्पा मोहन कोळी, मुंबई; विजया विठ्ठलराव ढगे, वर्धा; संतोष अशोक वेदपाठक, सोलापूर; दीपावली विनायक पाटील, जळगांव; विजय दत्ताजी जाचक, यवतमाळ; बंडू लक्ष्मणराव खांडरे, वर्धा; योगिता मुरलीधर पाटील, नाशिक; श्यामसुंदर आनंदराव मेघरे, वर्धा; शैला महेश पाटील, सोलापूर; निलेश दत्तात्रय गवळी, पालघर; किरण प्रतापसिंह कदम, पुणे; सचिन बाळासाहेब तावरे, पुणे; यांची निवड करण्यात आली आहे.

सर्व विजेत्यांचे शिक्षक ध्येय, साई समर्पण संकल्प, नांदेड; विलास नामदेवराव व्हटकर, मुंबई, यशिता गार्डन नर्सरी, वर्धा आणि आई कनकाई सामाजिक संस्था, होडगांव (कोंड), ता. माणगांव जि. रायगड यांनी अभिनंदन केले आहे.

थोडक्यात

## लोधी समाजाच्या एकजुटीचे दर्शन घडविणारे महाअधिवेशन रविवारी नागपुरात

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्यासह साक्षी महाराज स्वामी श्रीकंठनंद व राजवीर सिंग (राजू भैय्या) यांचीची उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोधी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकासाला नवी दिशा देण्यासाठी येत्या रविवारी, ६ सप्टेंबर रोजी नागपुरातील रेशीमबाग परिसरातील कवीवर्य सुरेशभट सभागृहात भव्य लोधी समाज महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. अखिल भारतीय लोधी, लोध, राजपूत कल्याण महासभा तसेच समाजातील विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या अधिवेशनाला महामंडलेश्वर श्री साक्षी महाराज स्वामी श्रीकंठनंद व राजवीर सिंग (राजू भैय्या) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महाअधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीनजी गडकरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच राष्ट्रीय मागास आयोगाच्या अध्यक्षा साध्वी निरंजन ज्योती यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात लोधी समाजासमोरील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांवर विचारमंथन करण्यात येणार असून, युवक व महिलांचा सहभाग वाढविणे, शिक्षण-रोजगाराच्या संधी, समाजातील संघटनात्मक एकजूट आणि समाजहिताच्या विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याने हे महाअधिवेशन लोधी समाजाच्या एकजुटीचे आणि संघटनात्मक शक्तीचे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. अखिल भारतीय लोधी राजपूत कल्याण महासभेचे राष्ट्रीय मंत्री राम खरपुरिया लोधी यांनी समाजबांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाअधिवेशन यशस्वी करावे, असे आवाहन केले आहे.

## धारिवाल इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेडच्या माध्यमातून येरुर येथे निर्माण होत असलेल्या "वृद्ध पार्क"चा भूमिपूजन सोहळा संपन्न

### वृद्ध पार्क ही वरिष्ठ नागरिकांच्या सेवेत अभिनव अशी संकल्पनेची मुहूर्तमेढ : देवेश कुमार, प्लांट हेड धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

गावाचा आधारस्तंभ हे वरिष्ठ नागरिक असतात. त्यांचे अनुभव हे भावी पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. यशस्वी जीवनाच्या वाटचालीसाठी युवा वर्गांनी त्यांच्या मार्गदर्शनाचे अनुकरण केल्यास एक सद्विचारी समाज घडेल, परंतु वरिष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे हे महत्वाचे आहे. वरिष्ठ नागरिकांना शुद्ध पर्यावरणाचा सहवास लाभावा, त्यांचे जीवनमान सुदृढ आरोग्यमय व्हावे हे सामाजिक उद्दिष्ट उराशी बाळगून येरुर येथे वृद्ध पार्क हि वरिष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी अभिनव अशा संकल्पनेची मुहूतमेढ होत असल्याचे प्रतिपादन धारिवाल इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेड चे प्लांट हेड देवेश कुमार यांनी केले. येरुर या गांवात धारिवाल इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेड च्या वतीने 4 एकर सार्वजनिक क्षेत्र विकसित करून विविधांगी वृक्षांची लागवड करीत जेष्ठ नागरिकांसाठी वृद्ध पार्क ची निर्मिती होणार आहे, या पार्कच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते.

प्रसंगी मंचावर सरपंचा प्रियंका मडावी, उपसरपंचा सुनीता वडस्कर, माजी सभापती विजय बल्की, ग्रा. प. सदस्य रमेश बुच्चे, धारिवाल इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेड चे उपमहाव्यवस्थापक दिनेश गाखर, अमोल गिरडकर , डॉ. अनीस नायर, देवाशिष रॉय, रवींद्र उपाध्याय यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुढे बोलतांना देवेश कुमार यांनी पर्यावरणाचे महत्व विषद करतांना वृद्ध पार्क च्या निर्मिती व संगोपनाची माहिती दिली. हा पार्क स्वच्छ, सुंदर, हरीत व सोयीयुक्त असेल यासाठी सर्व गावकऱ्यांनी व्यक्तिशः जबाबदारी स्वीकारावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या पार्क मध्ये होणाऱ्या ८००० आणि अधिक वृक्षारोपणामुळे परिसरातील हवा अधिक निरोगी होईल असा विश्वास सुद्धा त्यांनी आपल्या संबोधनातून व्यक्त केला. यावेळी मंचावर उपस्थित सरपंच, उपसरपंच व मान्यवरांनी धारिवाल इन्फ्रास्ट्रकचर लिमिटेडच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल आभार व्यक्त करीत उपस्थितांना यथोचित मार्गदर्शन केले. यावेळी यांची व असंख्य गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## नेहरूनगर झोनद्वारे एकाच दिवसात १२ लाख रुपयांची थकीत कर वसुली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेची धडक मोहिम सुरू करण्यात आली आहे. शहरातील दहाही झोनमधील थकीत मालमत्ता कराच्या वसुलीच्या मोहिमेला सुरूवात झाली असून, गुरुवारी (ता.३) रोजी नेहरूनगर झोनद्वारे मे. विठोबा लॉन यांच्याकडून ५ लाख ४८ हजार ४८० रुपयांची वसुली करण्यात आली, तसेच माजी पोलीस कर्मचारीकडून ६ लाख ५५ हजार ९९३ रुपयांची वसुली करण्यात आली. अशी एकूण १२ लाख ४ हजार ४७३ रुपयांची वसुली करण्यात आली आहे. ही मोहीम येत्या ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. महापौर निता ठाकरे यांच्या निदेर्शानुसार व आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात मोहिमेला सुरूवात झाली आहे. या मोहिमेचे नेतृत्व मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम करीत आहे. मनपाच्या स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर तथा कर संकलन विशेष समिती सभापती सरिता कावरे यांनीही नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले आहे.

# लोकसहभागातून उमठ्याचा विकासाचा नवा अध्याय !

### जलसंधारण, वृक्षसंवर्धन, स्वच्छता अन् सामाजिक उपक्रमांतून गावाने निर्माण केला आदर्श

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

गावाचा विकास केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता ग्रामस्थांची एकजूट, लोकसहभाग आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावरही साधता येतो, हे नरखेड तालुक्यातील उमठा गावाने प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक तसेच शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून उमठा गावाने विकासाची नवी ओळख निर्माण केली आहे.




गावातील विविध उपक्रमांमध्ये युवक, महिला, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. 'आपले गाव, आपली जबाबदारी' ही भावना मनात ठेवून ग्रामस्थांकडून गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, रस्ते व परिसराची देखभाल, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन यासह विविध जनजागृती अभियानांना गावात चालना देण्यात आली आहे.

उमठा गावाने जलसंधारणाच्या कामांवर विशेष भर दिला आहे. पावसाचे पाणी गावातच अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेतून जलसाठा निर्माण करण्यासोबतच भूजलपातळी वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा फायदा शेतीसह गावातील पाण्याच्या उपलब्धतेलाही होत आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपणासोबतच लावलेली झाडे जगविण्यावर ग्रामस्थांचा भर आहे. केवळ वृक्षारोपणाचे कार्यक्रम न घेता त्यांची नियमित देखभाल करण्याची जबाबदारीही नागरिकांकडून स्वीकारली जात आहे. या उपक्रमात गावातील तरुणांचा सहभाग विशेष उल्लेखनीय आहे.

उमठा येथील लोकसहभागातून उभारण्यात आलेले टेकडी मंदिर हे ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक ठरत आहे. धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांसोबतच या परिसरातून सामाजिक एकोपा आणि ग्रामविकासाचा संदेश दिला जात आहे. विविध धार्मिक कार्यक्रम, प्रबोधनात्मक उपक्रम आणि जनजागृती कार्यक्रमांमुळे गावातील सामाजिक वातावरण अधिक बळकट होत आहे.

गावाच्या विकासात युवकांचा वाढता सहभाग ही उमठ्याची आणखी एक जमेची बाजू आहे. स्वच्छता, पर्यावरण, जलसंधारण आणि सामाजिक उपक्रमांमध्ये युवक पुढाकार घेत आहेत. महिलांचाही विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग असून, ग्रामस्थांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे अनेक कामांना गती मिळत आहे.

शासनाच्या योजनांचा लाभ घेतानाच लोकसहभागातून विकासकामे उभी करण्याची भूमिका उमठा ग्रामस्थांनी स्वीकारली आहे. गावातील समस्या केवळ प्रशासनाकडे सोपविण्याऐवजी त्यावर सामूहिकपणे उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे उमठा गाव ग्रामीण विकासासाठी एक सकारात्मक आणि प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

'गावाच्या विकासासाठी केवळ ग्रामपंचायतीनेच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे. उमठा गावातील नागरिकांचा सहभाग हीच गावाची मोठी ताकद आहे.'

**– निलेश ठाकरे**

'पाणी अडवा, पाणी जिरवा आणि वृक्षसंवर्धनासारख्या उपक्रमांचा भविष्यात मोठा फायदा होणार आहे. गावातील तरुणांनी या कामात पुढाकार घेतल्यास उमठा आणखी विकसित होईल.'

**– प्रवीण दहेकर**

'स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उपक्रमांमुळे गावातील वातावरणात सकारात्मक बदल झाला आहे. सर्व ग्रामस्थांनी एकत्रितपणे हे उपक्रम पुढेही सुरू ठेवले पाहिजेत.'

**– विजय पोटपिटे**

'शासनाच्या योजनांचा लाभ घेतानाच लोकसहभागातून गावाचा विकास करण्याची उमठा गावाची पद्धत कौतुकास्पद आहे. इतर गावांनीही उमठ्याच्या उपक्रमांचा आदर्श घ्यावा.'

**– डॉ. भाष्करराव विघे**

## तुमसर पोलीस स्टेशन येथे तालुकास्तरीय शांतता व जातीय सलोखा बैठक संपन्न

### आगामी सन उत्सव विशेषता राज्य महोत्सव श्रीगणेश उत्सव पारंपारिक पद्धतीने करावे : नुरुल हसन, पोलीस अधीक्षक भंडारा

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

नूरुल हसन पोलीस अधीक्षक भंडारा, यांच्या अध्यक्षतेखाली आगामी सन उत्सव तसेच राज्य उत्सव श्री गणेश उत्सवा दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने तुमसर पोलीस स्टेशन येथे तालुकास्तरीय शांतता व जातीय सलोखा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे माध्यमातुन सार्वजनीक गणेश उत्सव साजरा करतांना सर्व विभागांच्या प्रमुखांनी आपआपल्या विभागातील जबाबदारी निश्चीत करुन सामान्य नागरीकांच्या सुरक्षेसंबंधाने काम करावे अशा सुचना उपस्थीत मान्यवरांनी दिल्या.



नुरुल हसन पोलीस अधिक्षक सा. भंडारा, यांनी त्यांचे अध्यक्षीय भाषणात सार्वजनीक गणेश उत्सव दरम्यान शांतता व सुव्यवस्था कायम राहावी या अनुषंगाने महत्वाच्या सुचना दिलेल्या आहेत त्यामध्ये विशेषकरुन डाल्बी डिजे चा वापर करु नये पारंपारीक वाद्यांचा वापर करावा, वाहतुकीचे नियम पाळावे, अंमली पदार्थांचे सेवन करु नये, अनधिकृत हालचालींवर विशेष लक्ष ठेवुन काही आक्षेपार्ह आढळुन आल्यास डायल ११२ मार्फत संपर्क साधावे, कोणतेही आक्षेपार्ह विधाने करू नये, शोसल मिडीयावर प्रसारीत होणाऱ्या अफवा किंवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवु नये व प्रसारीत करु नये, जाती धर्मा मध्ये तेढ निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करु नये, अशा प्रकारचा संदेश नूरुल हसन पोलीस अधिक्षक सा. भंडारा यांनी उपस्थीत शांतता व जातीय सलोखा समितीचे पदाधिकारी, प्रतिष्ठीत नागरीक, पोलीस पाटील, पत्रकार तसेच गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी यांना सदर बैठकीचे माध्यमातुन संबोधीत करुन नागरिकांना शांतता, व कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन करण्यात आले व कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलीसांना माहिती देण्याचे आवाहन पोलीस विभागाचे मार्फतीने करण्यात आले.



तालुकास्तरीय शांतता व जातीय सलोखा बैठकीस प्रामुख्याने अंजली भोसले, उपविभागीय दंडाधिकारी, शिवम विसापुरे उपविभागीय पोलीस अधिकारी, अतिरीक्त कार्यभार तुमसर उपविभाग, सुभाष बारसे ठाणेदार पो. स्टे. तुमसर, उपेश अंबादे तालुका दंडाधिकारी तुमसर, करन चव्हान मुख्याधिकारी नगरपरीषद तुमसर, प्रशांत महाजन, सहा. अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग तुमसर, नंदकुमार वाडेकर, खंडविकास अधिकारी पंचायत समिती तुमसर, सचिन बोपचे उपनगराध्यक्ष नगरपरिषद तुमसर, सचिन आगरकर आगार प्रमुख तुमसर, डॉ. नितीन मीसुरकर वैद्यकीय अधिकारी सु. बो. दवाखाना तुमसर, अमित पाटील सहाय्यक अभियंता एमएसई बी विभाग तुमसर, तसेच तुमसर उपविभागातील ठाणेदार नितीन राठोड पोलीस स्टेशन आंधळगाव, विजय कासोधन पोलीस स्टेशन सिहोरा, अभिजीत पाटील पोलीस स्टेशन गोबरवाहि, बाळासाहेब आघाव पोलीस स्टेशन तुमसर, सपोनी किशोर घोडेस्वार, आकाशकुमार साखरे पोलीस स्टेशन तुमसर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक राहुल डोंगरे यांनी केले असून कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री अभिजीत पाटील ठाणेदार पोलीस स्टेशन गोबरवाहि यांनी केले.

भंडारा जिल्हा पोलीस प्रशासन आगामी सण उत्सव विशेषता राज्य महोत्सव श्री गणेश उत्सव दरम्यान नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असून कायदा व सुव्यवस्था भंग करण्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले.

## बल्लारपूर नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष देवेंद्र आर्य यांनी रेल्वेसंबंधित समस्यांबाबत दिले खा. धानोरकर यांना निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

रेल्वेसंबंधित विकासकामांमुळे बल्लारपूर शहरातील रहिवाशांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांबाबत बल्लारपूर नगर परिषदेचे उप नगराध्यक्ष देवेंद्र आर्य यांनी चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांना रेल्वेसंबंधित समस्यांबाबत निवेदन सादर केले.

या निवेदनात मागणी करण्यात आली आहे की, तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मागार्चे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, आंबेडकर वॉर्ड आणि राणी लक्ष्मीबाई वॉर्डमधील सांडपाण्याचा नाला रेल्वेच्या हद्दीतून वाहतो. आणि गोल पुलाजवळून ओलांडून नदीला मिळतो.तथापि, तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गांच्या बांधकामामुळे, गोल पुलाजवळचा नाला तुंबला आहे, त्यामुळे दोन्ही वॉर्डांतील घरांमध्ये घाणेरडे पाणी शिरत आहे. या नाल्यावर कायमस्वरूपी धरण बांधून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढला पाहिजे, बस्ती भागाला शहराच्या उर्वरित भागाशी जोडणारा एकमेव रस्ता या गोल पुलाखालून जातो.तथापि, तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गांच्या सुरू असलेल्या बांधकामामुळे, गेल्या दीड वर्षांपासून पादचाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे, कृपया गोल पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करा आणि वाहतूक सुरळीत



राहील याची खात्री करा. तसेच बस्ती भागाच्या बाजूला एक तिकीट काउंटर उघडले पाहिजे. बल्लारपूर शहराच्या या समस्या योग्य व्यासपीठावर मांडाव्यात आणि त्यांचे निराकरण करावे.

## अवैध गांजा बाळगणाऱ्यावर कारवाई; १ किलो ११५ ग्रॅम गांजा जप्त

**नांदेड :** देगलूर उपविभागीय पोलिसांनी मुखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करून अवैधरीत्या गांजा बाळगून विक्री करणा्नैया एका इसमास ताब्यात घेतले. या कारवाईत १ किलो ११५ ग्रॅम वाळलेला गांजा आणि १२५ ग्रॅम वजनाची गांजाची हिरवी रोपे, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त गांजाची शासकीय किंमत २५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. दि. २ सप्टेंबर रोजी देगलूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार मुखेड तालुक्यातील उंद्री, पं.दे. येथील आरोपी सुधाकर संतुकराव वडजे याच्या घरी ३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री पथकाने झडती घेतली. घराच्या अंगणातील एका ठिकाणी वाळलेल्या गांजाचे शेंडे व चुरा तसेच गांजाची हिरवी रोपे आढळून आली. वजन केल्यानंतर वाळलेला गांजा १ किलो ११५ ग्रॅम, तर हिरव्या गांजाच्या रोपांचे वजन १२५ ग्रॅम भरले. या प्रकरणी सुधाकर संतुकराव वडजे याच्याविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात एनडीपीएस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बामणी टी पॉइंटवर गांजाची तस्करी उघड,१७.४७५ किलो गांजासह तिघांना अटक : एलसीबीची कारवाई

### चारचाकी वाहन व चार मोबाईलसह १७.०८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

ओडिशातून गांजा आणून त्याची अवैध विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बामणी टी पॉइंट येथे सापळा रचून अटक केली. आरोपींकडून १७.४७५ किलो गांजा, चारचाकी वाहन आणि चार मोबाईल असा एकूण १७ लाख ८ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



२ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांना गुप्त बातमीदाराकडून ओडिशातून काही इसम चारचाकी वाहनाने गांजा घेऊन येत असल्याची माहिती मिळाली. हा गांजा विक्रीसाठी आणला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी बल्लारपूर-राजुरा मार्गावरील बामणी टी पॉइंट येथे सापळा रचला.

यावेळी संशयित चारचाकी वाहन क्रमांक एमएच-२४ बीआर-९२८२ पोलिसांनी अडवून तपासणी केली. वाहनातील अमोल रमेश कांबळे ३३ वर्ष रा. एरंडी सरोडा, ता. औसा, जि. लातूर, सदानंद रविंद्र जना ३२ वर्ष व्यवसाय मजुरी, रा. साबोरिया, ता. खलीगोट, जि. गंजाम, ओडिशा आणि ओंगा बिरा कोवासी २८ वर्ष व्यवसाय मजुरी, रा. बोपनपल्ली, ता. कालीमेला, जि. मलकानगिरी, ओडिशा यांच्याकडे तपासणी केली असता १७.४७५ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजासह चारचाकी वाहन आणि आरोपींच्या ताब्यातील वापरते चार मोबाईल असा एकूण १७ लाख ०८ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी आरोपींविरुद्ध बल्लारपूर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ (एनडीपीएस कायदा) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक दीपक कॉंक्रेडवार, सहायक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकार, पोलीस उपनिरीक्षक सर्वेश बेलसरे, सफौ स्वामीदास चालेकर, पोहवा अजय बागेसर, पोहवा गणेश भोयर, पोहवा रामराव बिंगेवाड, पोहवा शरद कुडे, पोहवा रजनीकांत पुठ्ठावार, पोहवा सचिन गुरनुले, पोहवा सुभाष गोहोकार, पोअं प्रतिक हेमके, पोअं विठ्ठल काकडे, पोअं प्रफुल पुप्पलवार, दिनेश अराडे यांनी केले.

# नागपुरातून दत्तक प्रक्रियेला नवी दिशा, सात बालकांना मिळाले हक्काचे कुटुंब

### फ्रान्ससह मुंबई, पुणे व वर्धा येथील दत्तक इच्छुक पालकांना कायदेशीर दत्तक आदेश; उअफ्ञ मार्गदर्शक प्रणालीद्वारे ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि कायमस्वरूपी कुटुंब मिळावे, या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या दत्तक प्रक्रियेला नागपुरात महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. केंद्रीय दत्तक प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक प्रणालीद्वारे सात बालकांच्या दत्तक आदेशाची ऑनलाइन प्रक्रिया दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी पूर्ण करण्यात आली.

नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया शासनाच्या निर्धारित नियमांनुसार पार पडली. या प्रक्रियेद्वारे फ्रान्स येथील १, मुंबई येथील ३, पुणे येथील २ आणि वर्धा येथील १ अशा एकूण सात बालकांना दत्तक इच्छुक पालकांचे कायदेशीर कुटुंब मिळाले.

महाराष्ट्रात CARA च्या मार्गदर्शक प्रणालीचे ऑनलाइन अपडेट करण्याची प्रक्रिया नागपूर येथून करण्यात आल्याने दत्तक प्रक्रियेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे. ऑनलाइन पद्धतीमुळे दत्तक प्रक्रियेत पारदर्शकता, कायदेशीरता, सुलभता आणि कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होत आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, संरक्षण अधिकारी विनोद शेंडे, कायदा व परिविक्षा अधिकारी सुजाता गुल्हाने, तसेच श्रद्धानंद दत्तक संस्थेच्या ललिता गावंडे व प्रतिमा दिवाणजी यांच्यासह दत्तक इच्छुक पालक व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बालकांच्या सर्वोत्तम हिताला सर्वोच्च प्राधान्य देत शासनाच्या नियम व मार्गदर्शक तत्त्वांनुसार दत्तक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सात बालकांना कायदेशीररित्या कुटुंबाचा आधार मिळाल्याने त्यांच्या भविष्यासाठी सुरक्षित, प्रेमळ आणि कौटुंबिक वातावरण उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

**बालकांच्या पुनर्वसनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल**

बालकांना संस्थात्मक संगोपनाऐवजी शक्य तितक्या सुरक्षित आणि कौटुंबिक वातावरणात वाढण्याची संधी मिळावी, हा दत्तक प्रक्रियेचा प्रमुख उद्देश आहे. दत्तक प्रक्रियेमुळे बालकांना केवळ कुटुंब मिळत नाही, तर त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, भावनिक सुरक्षिततेसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आधार मिळतो.

नागपुरातून पार पडलेली ही ऑनलाइन दत्तक प्रक्रिया बाल संरक्षण व पुनर्वसनाच्या दिशेने महत्त्वाचे सकारात्मक पाऊल ठरली असून, सात बालकांना हक्काचे कुटुंब मिळाल्याने त्यांच्या जीवनाला नव्या आशेची आणि सुरक्षित भविष्याची दिशा मिळाली आहे.

थोडक्यात

## 'ज्ञानेश्वर माऊली' संगीत-नाट्य कार्यक्रम ४ सप्टेंबर रोजी

### संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त विशेष सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त 'ज्ञानेश्वर माऊली' या भव्य संगीत व नाट्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता लक्ष्मीनगर येथील आठ रस्ता चौकातील सायंटिफिक सभागृहात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे नियोजन मुद्रा इवेंट्सच्या मनीषा काशीकर यांनी केले असून, नाट्य दिग्दर्शन निखिल टोंगळे आणि संगीत परिमल जोशी यांचे आहे. कार्यक्रमात अनिरुद्ध देशपांडे, लक्षयती काजळकर व मनीषा काशीकर गीते सादर करतील. संत ज्ञानेश्वर यांच्या भूमिकेत यश खेर राहणार असून नेपथ्य सुनील हमदापूरे यांचे व निरुपण आदित्य देशकर यांचे राहील. रसिकांसाठी या कार्यक्रमात विनामूल्य प्रवेश असणार आहे. नागरिकांनी या सांस्कृतिक मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

## आमगाव खुर्द येथील नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृह पूर्ववत सुरू करण्यासाठी निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

आमगाव खुर्द, सालेकसा येथील अनाथ, भटके व भिक्षेकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेले नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृह पूर्ववत सुरू करण्यात यावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुका सालेकसा व सालेकसा तालुक्यातील नागरिकांच्या वतीने २ सप्टेंबर २०२६ रोजी गोंदिया येथे निवेदन देण्यात आले. आमगाव खुर्द येथे ५ ऑक्टोबर २०१३ रोजी अनाथ, भटके व भिक्षेकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृहाची स्थापना करण्यात आली होती. हे वसतिगृह तब्बल १४ वर्षे योग्य नियोजन व व्यवस्थापनाच्या माध्यमातून ५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुरळीतपणे सुरू होते. स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून मा. तहसीलदार काम पाहत होते. मात्र, काही प्रशासकीय निर्णयांमुळे हे वसतिगृह बंद करण्यात आले. त्यामुळे येथे राहणारे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित झाले असून, काही विद्यार्थी अल्पवयातच व्यसनाधीनतेकडे वळत असल्याचे तसेच सालेकसा शहरातील चौकाचौकात भिक्षा मागताना दिसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक असून, शासन एकीकडे प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण मिळावे यासाठी विविध योजना राबवत असताना अशा विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेले वसतिगृह बंद होणे ही दुर्दैवी बाब असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. या वसतिगृहात सुमारे ५० विद्यार्थी वास्तव्यास होते. त्यांच्या संगोपन व शैक्षणिक व्यवस्थेसाठी ७ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. वसतिगृह बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांसोबतच या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवरही आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्ह्याचे लोकप्रिय नेते खासदार राजेंद्रजी जैन, गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री इंद्रनीलजी नाईक आणि गोंदिया जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य सभापती सुरेशभाऊ हर्षे यांना निवेदन देऊन वसतिगृह पूर्ववत सुरू करण्यासाठी शासन स्तरावर तातडीने पाठपुरावा करावा तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदनाची दखल घेत खासदार राजेंद्रजी जैन व पालकमंत्री इंद्रनीलजी नाईक यांनी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याचे तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले. त्यामुळे बंद असलेले वसतिगृह लवकरच पूर्ववत सुरू होण्याची आशा व्यक्त करण्यात येत आहे. हे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ. अजय उमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, युवा कार्यकर्ते रिषी बैस व संजय ब्राह्मणकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सालेकसा तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावनेरमध्ये घरात २७ वर्षीय हातमजुराचा मृत्यू, मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर शहरातील एका घरात व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना मिळाली. त्यांनी तत्काळ



सावनेरचे एसडीपीओ सागर खर्डे यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर सावनेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मृतकाचे नाव अनिल फुलसु उईके (वय २७) असून ते रा. लेंदाघोंडी, छिंदवाडा, मध्य प्रदेश येथील रहिवासी आहेत. मृतक आपल्या बहिणीकडे सावनेर येथे आले होते आणि हातमजुरीचे काम करून उदरनिर्वाह करत होते. मृतकाच्या दोन्ही पायांवर जुन्या जखमा असल्याचे दिसून आले आहे. या जखमा कशामुळे झाल्या आणि त्यांचा मृत्यूशी काही संबंध आहे का, याबाबत सध्या स्पष्ट माहिती नाही. घटनेची माहिती मिळाल्यानंतर हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमच्या मदतीने त्यांना सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत तज्ज्ञांचे मत घेण्यात येणार असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी सावनेर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६

### देश-विदेशांतील मंडळांनाही सहभागाची संधी, सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे संयुक्त आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महाराष्ट्रात उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले आहे. या महोत्सवांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या स्पर्धेचा विस्तार यावर्षी देश पातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. परिणामी, महाराष्ट्रासोबतच देशभरात आणि जगभरात विधायक उपक्रमांद्वारे गणेशोत्सव साजरा करणाऱ्या सार्वजनिक मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता येणार असून त्यांच्यासाठी स्वतंत्र तीन पारितोषिके घोषित करण्यात आली आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. इच्छुक मंडळांना अर्ज सादर करण्यासाठी सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. स्पर्धेचे अर्ज https://ganeshotsav.pldmka.co.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जात आहेत. अधिकाधिक मंडळांनी या स्पर्धेत सहभागी होऊन तालुका ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील पारितोषिके मिळवावीत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले आहे.

स्पर्धेतील पारितोषिकांचे स्वरूप : आंतरराष्ट्रीय पातळी : प्रथम ७.५ लाख रुपये, द्वितीय ५ लाख रुपये, तृतीय २.५ लाख रुपये, राष्ट्रीय पातळी : प्रथम ७.५ लाख रुपये, द्वितीय ५ लाख रुपये, तृतीय २.५ लाख रुपये., राज्य पातळी : प्रथम ७.५ लाख रुपये, द्वितीय ५ लाख रुपये, तृतीय २.५ लाख रुपये. जिल्हा पातळी : प्रथम ५० हजार रुपये, द्वितीय ४० हजार रुपये, तृतीय ३० हजार रुपये. तालुका पातळी : तालुकास्तरीय विजेत्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये आणि प्रमाणपत्र. या राज्य महोत्सवांतर्गत विविध विधायक उपक्रमही राबवण्यात येत आहेत.

## नीलकंठ पचारे यांचा सेवापुर्ती समारंभ संपन्न

### शिक्षक सुजाण, सुसंस्कृत पिढी घडवितो : माजी आमदार आनंदराव देशमुख



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक प्रयत्न राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे नुकताच नीलकंठ पचारे यांचा सेवापुर्ती समारंभ नुकताच पार पडला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार आनंदरावजी देशमुख, सदस्य होमराज हजारे, घनश्याम बर्वे अध्यक्ष मुख्याध्यापक रविंद्र चन्ने, पर्यवेक्षक शैलेश परमार, मुख्याध्यापक निलेश टोंगसे, मुख्याध्यापक राजु बर्वे, सोनीराम धोटे, सेवानिवृत्त शिक्षक संजीव दर्यापूरकर, सरोज पेटकर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी नीलकंठ पचारे यांचा सहकुटुंब शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सौभाग्यवती सुमन, मुलगा राजेश, मुलगी वैष्णवी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार आनंदरावजी देशमुख यांनी, "शिक्षक हा समाजातील महत्वपूर्ण घटक असून विद्यार्थी, समाज आणि नवी, सुसंकृत, सुजाण पिढी घडवीत असतो. राष्ट्रीय आदर्श विदयालय शिक्षण मंडळाच्या विविध विद्यालयात कार्य करतांना दर्जेदार शिक्षण देत असतांना गुणवंत आणि समाजात नवा आदर्श घडविणारे विद्यार्थी निर्माण केले, असे विचार व्यक्त केले. यावेळी सत्काराला उत्तर देतांना, २८ वर्षे शिक्षक म्हणून कार्य करताना विभिन्न स्वरूपाचे अनुभव आले.शिकवणे हा आनंदीदायी अनुभवी असून विद्यार्थ्यांना जेवढं काही देता आलं ते मनापासून दिले. विद्यार्थ्यांना घडवताना स्वतःलाही खुप काही शिकता आले. समाजाला घडविण्याचा, चांगले बदल घडवून आणण्याचा शाळा, शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक हा महत्वपूर्ण भाग आहे."असे विचार व्यक्त केले.यावेळी सदस्य होमराज हजारे, मुख्याध्यापक राजु बर्वे यांनीही विचार व्यक्त केले.

मनमिळाऊ, हसतमुख, संयमी व्यक्तिमत्व सहकारी म्हणून मिळणं ही फार मोठी उपलब्धी आहे", असे विचार व्यक्त केले. यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी विजय पाटील, नामदेव खडसे, अरविंद खेडकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी वर्गाने प्रयत्न केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय पिसे,प्रास्ताविक अरविंद कोहळे आणि आभार प्रदर्शन विठ्ठल वाघाडे यांनी केले.

## सालेकसा पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक संपन्न

### आगामी सण शांतता, सौहार्द व सामाजिक सलोख्याने साजरे करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**



आगामी काळात येणारे श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, गणेशोत्सव तसेच इतर सण-उत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक सलोखा कायम ठेवून साजरे करण्यात यावेत, या उद्देशाने दिनांक ३ सप्टेंबर २०२६ रोजी सालेकसा पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चानपूरकर यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच सालेकसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवी नागोसे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडली.

बैठकीदरम्यान आगामी सण-उत्सवांच्या अनुषंगाने विविध महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सामाजिक सलोखा टिकविणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सर्व सण शांतता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात साजरे व्हावेत, यासाठी शांतता समितीच्या सर्व सदस्यांनी प्रशासन व पोलीस विभागाला सहकार्य करून समाजात आदर्श निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित**

या बैठकीस शांतता समितीचे सदस्य विनय शर्मा, ब्रजभूषण बैस, मायकल मेश्राम, नगरपंचायतचे नगराध्यक्ष विजय फुंडे, प्रा. राकेश रोकडे, विनोद जैन, बद्रीप्रसाद दशरिया, मुश्ताक अन्सारी, रघुदास नागपुरे, पत्रकार राजू फुंडे, मुकेश ढेकवार, योगिता असाटी, अनिता चुटे, प्रतिभा शिवणकर, छन्नू शिवणकर, प्रेरणा बंडीवार, विनोद मडावी, अतुल रेड्डीवार, रितेश लिल्हारे, पल्लवी शिवणकर, रामबती पुसाम, सतीश करवाडे, सतीश टेंभरे तसेच शांतता समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. बैठक यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी पोलीस शिपाई विशाल जनबंधू यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आश्वासनानंतर शिक्षक समितीचे आंदोलन तूर्तास स्थगित !

### वेतनश्रेणी, सेवासातत्य, वैद्यकीय देयके व शाळांच्या सुविधांबाबत प्रशासनाची तातडीच्या कार्यवाहीची ग्वाही

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**



शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले. जिल्हा परिषद अध्यक्ष लायकरामजी भेंडारकर यांच्या दालनात शिक्षणाधिकारी पवन खंडारे व उपशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे यांच्या उपस्थितीत शिक्षक समितीच्या शिष्टमंडळासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सकारात्मक चर्चेनंतर ८ सप्टेंबर २०२६ रोजीचे नियोजित एकदिवसीय धरणे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले.

बैठकीत प्राथमिक शिक्षकांना S-१४ वेतनश्रेणी, मूळ रुजू दिनांकापासून चटोपाध्याय व निवडश्रेणी, पदवीधर विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी, वंचित १९ शिक्षकांची निवडश्रेणी, आदिवासी उपाययोजनेतील गावांना एकस्तर वेतनश्रेणी, सेवासातत्याची प्रकरणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती, अतिरिक्त घरभाडे भत्ता, GPF ऑनलाइन करणे, अपुरी पाठ्यपुस्तके, १६व्या वित्त आयोगातून शाळांना निधी, FSSAI व पोषण शक्ती योजनेची जबाबदारी तसेच २०२२-२३ पासून प्रलंबित पोषण आहार देयके या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली.

चटोपाध्यायची १०० टक्के प्रकरणे याच आठवड्यात निकाली काढणे, १९ शिक्षकांच्या निवडश्रेणीवर तातडीने कार्यवाही, अपुऱ्या पाठ्यपुस्तकांची पूर्तता तसेच इतर प्रकरणे जलदगतीने मार्गी लावण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. S-१४ बाबत मंत्रालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असून मार्गदर्शन मिळताच कार्यवाही करण्याचे सांगण्यात आले. ऋरअक व पोषण शक्ती योजनेबाबत जिल्हा परिषद ठराव घेऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचेही आश्वासन देण्यात आले.सकारात्मक भूमिकेबद्दल अध्यक्ष लायकराम भेंडारकर,अर्थ व बांधकाम सभापती लक्ष्मणजी भगत, जिल्हा परिषद सदस्य तुमेश्वरी बघेले,शिक्षणाधिकारी पवन खंडारे व उपशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे यांचे समितीने आभार मानले.

बैठकीस जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, विभागीय अध्यक्ष किशोर डोंगरवार, सरचिटणीस संदीप मेश्राम, जिल्हानेते एच. एस. बिसेन, उपाध्यक्ष पुरुषोत्तम साकुरे, महिलाध्यक्ष ममता येडे, महिला सरचिटणीस कु. प्रतिमा खोब्रागडे, संघटक राज कडव, संघटक उमेश रहांगडाले, जिल्हापदाधिकारी शोभेलाल ठाकूर, जिल्हाप्रतिनिधी दिलीप लोदी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख शालिक कठाणे, जिल्हाप्रतिनिधी ओमप्रकाश नंदनवार, तालुकाध्यक्ष अर्जुनी मोर आशिष कापगते, जिल्हामार्गदर्शक मितम हाटीले, सरचिटणीस आमगाव सुरेंद्र मेंढे, सरचिटणीस विजेंद्र केवट, तेजल बोपचे, धीरज शहारे, मुनेश्वर टेंभूरने, लोकेश नाकाडे, मंगेश पर्वते, दिनेश कापगते, मार्गदर्शक महिला आघाडी भारती तिडके व कु. मुन्नेश्वरी कटरे यांच्यासह शिक्षक समितीचे पदाधिकारी व शिक्षक बांधव उपस्थित होते.

# स्मार्ट मीटरच्या नावाखाली सुरू असलेली लूट थांबवा : सलील देशमुख

## अवाजवी वीजबिलांच्या तक्रारी वाढल्या, आश्वासन पाळण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी, अन्यथा तीव्र जनआंदोलनाचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

राज्यातील भाजप सरकारने सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक थांबवावी आणि स्मार्ट मीटरच्या नावाखाली सुरू असलेली वीज ग्राहकांची लूट तातडीने बंद करावी, अशी जोरदार मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नागपूर जिल्हाध्यक्ष सलील देशमुख यांनी केली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यात स्मार्ट मीटर लावले जाणार नाहीत, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. मात्र निवडणूक झाल्यानंतर महावितरणच्या माध्यमातून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने सरकारने जनतेचा विश्वासघात केला असल्याचा आरोप देशमुख यांनी केला.

नवीन स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीजबिलांमध्ये अचानक मोठी वाढ होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत असल्याचे सलील देशमुख यांनी सांगितले. पूर्वी दोन हजार रुपयांच्या आसपास येणारे वीजबिल थेट २५ ते २८ हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याच्या तक्रारी आहेत. काही बंद घरांनाही शून्य किंवा अत्यल्प वीजवापर असताना हजारो रुपयांची बिले पाठविण्यात आल्याचे प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांना योग्य माहिती देणे, मीटरची अचूकता तपासणे आणि बिलिंग प्रक्रियेत पारदर्शकता ठेवणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात ग्राहकांच्या शंकांचे समाधान न करता मीटर बसविण्याची घाई केली जात असल्याचा आरोप देशमुख यांनी केला. स्मार्ट मीटरमुळे वीजवापराचे अचूक मोजमाप होणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष बिलामध्ये अनाकलनीय वाढ होत असेल तर त्याची स्वतंत्रपणे चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

महागाईच्या काळात घरगुती वीजबिलाचा अतिरिक्त भार सर्वसामान्य कुटुंबांच्या अर्थकारणावर मोठा परिणाम करीत आहे. शेतकरी, छोटे व्यावसायिक, कामगार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना वाढीव बिलांचा फटका बसत असून, चुकीच्या बिलांमुळे नागरिकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महावितरणने स्मार्ट मीटर बसविलेल्या ग्राहकांच्या बिलांची फेरतपासणी करून अवाजवी आकारणी झाल्यास ती तातडीने दुरुस्त करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

या प्रश्नावर पक्षाच्या वतीने व्यापक जनआंदोलन उभारण्याची तयारी सुरू असून, नागरिकांच्या तक्रारी लेखी स्वरूपात संकलित करून सरकार आणि संबंधित वीज प्रशासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे सलील देशमुख यांनी सांगितले. ज्या ग्राहकांना अवाजवी किंवा भरमसाठ वीजबिले आली आहेत, त्यांनी बिलाची छायांकित प्रत जोडून तक्रार अर्ज पक्षाच्या कार्यालयात जमा करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

नागपूर येथे गणेशपेठ येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कार्यालय, काटोल येथे मेन रोड तार बाजार, कोंढाळी येथे बाजार रोड, नरखेड येथे गांधी चौक, भारसिंगी येथे मेन रोड तसेच वडविहीरा येथे निवासस्थानी तक्रारी स्वीकारण्यात येणार आहेत.

सरकारने निवडणुकीपूर्वी जनतेला दिलेले आश्वासन पाळून स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ रद्द करावी. स्मार्ट मीटरमुळे वाढलेल्या बिलांची चौकशी करून ग्राहकांना दिलासा द्यावा. अन्यथा सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या प्रश्नासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा सलील देशमुख यांनी दिला आहे.

# १ नोव्हेंबरपर्यंत नागपुरात डीजे बंदी, विश्वास नांगरे पाटलांचा मोठा निर्णय!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी १ नोव्हेंबरपर्यंत डीजेला बंदी घातली आहे. सध्या राज्यात गणेशोत्सवाची धूम आहे. हा उत्सव उत्साहवर्धक आणि चांगला ठरावा यासाठी मुंबई, पुणे तसेच राज्यभरातील सर्वच गणेश मंडळं कामाला लागली आहेत. पुणे आणि मुंबईचा गणोशोत्सव तर देशभरात चर्चेचा विषय असतो. दरम्यान, गणेशोत्सवासोतबच सणासुदीचे दिवस सुरू झाल्याने आता डीजेबंदी, लाऊडस्पीकरवरील बंदीची चर्चा सुरू झाली आहे. पुण्यात लाऊडस्पीकर तसेच डीजे, ढोल-ताशांवरील बंदीची मागणी जोर धरू लागली आहे. असे असतानाच आता नागपूरमध्ये मोठा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूरमध्ये डीजेवर बंदी घालण्यात आली आहे.समोर आलेल्या ताज्या माहितीनुसार नागपुरात आजपासून म्हणजेच ३ सप्टेंबर रोजीपासून एक नोव्हेंबरपर्यंत डीजेवर बंदी घालण्यात आली आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी हा निर्णय घेतला आहे. नागपुरात आज रात्रीपासून ते १ नोव्हेंबरपर्यंत डिजे, डिजेचे वाहन, डिम लाईट, लेजर लाईटवर बंदी असेल. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल. नागपूर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या या आदेशामुळे मिरवणुकीत डॉल्बी साऊंड सिस्टम वापरावर निर्बंध आले आहेत.



पुण्यात डीजे, डॉल्बी, ढोल-ताशे यावर बंदी घालावी अशी मागणी केली जात आहे. विद्यानंद बापट या सामान्य नागरिकाने याबाबत आवाज उठवला आहे. पुण्याच्या महापालिका बैठकीत त्यांनी जाहीरपणे डीजेवर बंदी घालावी अशी मागणी घातल्यानंतर हा मुद्दा आता पुण्यात चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. विद्यानंद बापट यांनी पुण्यात गणेशोत्सवाच्या मिरवणुकांवरही बंदी घालावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. ढोल ताशे कालबाह्य झालेली वाद्ये आहेत. गणेशोत्सवाच्या काळात ध्वनी प्रदूषण जास्त होते. त्यामुळे पुणेकरांना या काळात जास्त त्रास होतो, असे त्यांचे मत आहे. दरम्यान, आता नागपुरात डीजेवर बंदी घालण्यात आल्यानंतर नागपूरकरांच्या काय प्रतिक्रिया आहेत, तेथील गणेशमंडळे नेमकी काय भूमिका घेतील हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**थोडक्यात**

## २४ तासच्या आत एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या २ आरोपींना अटक



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांच्या नेतृत्वात दिनांक ०२/०९/२०२६ रोजी खापा पोलीसांनी २४ तासाच्या आत गुन्हयाची उकल करत खापा पोलीस स्टेशन अंतर्गत एटीएम फोडीचा प्रयत्न करणाऱ्या २ आरोपींना अटक केले आहे. पोलीस स्टेशन खापा अंतर्गत दिनांक ०२/०९/२०२६ रोजी फिर्यादी नामे राकेश भिमराव वानखेडे, वय ३५ वर्षे, रा. २०३ गॅलेक्सी मेन्शन शिवशक्ती मानेवाडा नागपूर यांनी पोलीस ठाणे, खापा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. ०१/०९/२०२६ रोजीचे यातील आरोपीतांनी बँक ऑफ बडोदा शाखा, खापा येथील मागच्या गल्लीत असलेले एटीएम मशीनचे समोरील पत्रा उघडे दिसत असल्याचे तसेच फोडण्याचा प्रयत्न तसेच पैसे चोरण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत असल्याचे फियार्दीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन खापा येथे कलम ३०५ (अ), ३०३ (२), ६२, ३(५) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

खापा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यात आरोपी १) अमर बंडूजी सराटे, वय २२ वर्षे, रा. आजनी, ता. सावनेर २) प्रेम विनोद वानखेडे, वय १९ वर्ष, रा. गणेश मंदिर सावनेर आणि त्यांचा साथीदार ३) विधी संघर्षग्रस्त बालक यांनी मिळुन सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. आरोपीला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची माहीती दिली. सदर गुन्हयातील आरोपी क्र. १) व २) यांना दिनांक ०२/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूरतर्फे के.डी.एस. शाळेला 'स्कूल मॅट'चे वाटप




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हा अध्यक्षा (डिस्ट्रिक्ट चेअरमन) मनीषा चौधरी यांच्या 'इनर व्हील क्लब ऑफ नागपूर'च्या अधिकृत भेटीदरम्यान (चेअरमन ऑफिशियल व्हिजिट) क्लबतर्फे के.डी.एस. शाळेला 'स्कूल मॅट' (शालेय चटई) भेट देण्यात आली. याचा फायदा सुमारे २०० विद्यार्थ्यांना होणार आहे. नागपूर येथील नवदृष्टी हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात जिल्हा अध्यक्षा मनीषा चौधरी यांच्या हस्ते ही मॅट शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. मीनल दवांडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. विद्यार्थ्यांना अधिक आरामदायक आणि बालस्नेही (चांगले) वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाचे प्रायोजन माजी अध्यक्षा डॉ. विजया खानजोडे यांनी केले होते. त्यांच्या आर्थिक सहकार्यामुळेच क्लबला ही उपयुक्त सुविधा शाळेला देणे शक्य झाले.

यावेळी अध्यक्ष पूजा सावजी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "छोट्या-छोट्या योगदानामुळेही मुलांच्या आयुष्यात मोठा आणि सकारात्मक बदल घडू शकतो. यामुळे त्यांना शिकण्यासाठी आणि घडण्यासाठी अधिक आरामदायक वातावरण मिळते." इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ही संस्था मुलांचे शिक्षण आणि कल्याणासाठी सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने अर्थपूर्ण उपक्रम राबवत आहे.

## दिनदहाड़े नाबालिग युवती पर चूक से हमला, मौके पर मौत

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

अमरावती शहर में उस समय सनसनी फैल गई, जब रविनगर चौक स्थित महाविद्यालय में घुसकर अपराधी ने नाबालिग युवती पर चाकू से हमला कर दिया। इस हमले में नाबालिग गंभीर रूप से घायल हो गई। दिन दहाड़े हुए वारदात से हड़कंप मच गया। घटना की जानकारी मिलते ही पुलिस तुरंत मौके पर पहुंची और युवती को इलाज के लिए अस्पताल ले जाया गया, जहाँ इलाज के दौरान उसकी मौत हो गई। शुरूआती जाँच में एक तरफा प्रेम में वारदात को अंजाम देने का मामला सामने आया है। पुलिस ने घटना स्थल पर कड़ा बंदोबस्त किया है और आरोपी की खोजबीन कर रही है।



मृतक नाबालिग की पहचान १७ वर्षीय शर्वरी गणेश हाळके, अंबा विहार, अमरावती निवासी के रूप में हुई है। राजापेठ पुलिस से मिली जानकारी के अनुसार, गुरुवार दोपहर १२.३० बजे नाबालिग छात्र रवि नगर स्थित हनुमान मंदिर के पास खड़ी थी। इसी दौरान आरोपी मौके पर पहुँचा और उसपर चाकू से हमला कर दिया। इस हमले में युवती गंभीर रूप से घायल हो गई। दिन दहाड़े हुई घटना से हड़कंप मच गया। तुरंत इसकी जानकारी पुलिस को दी गई, वारदात की खबर लगते ही पुलिस मौके पर पहुंची और उसके इलाज के लिए अस्पताल में भर्ती कराया गया। जहां इलाज के दौरान उसकी मौत हो गई। पुलिस की शुरूआती जाँच के अनुसार, एक तरफा प्यार में वारदात को अंजाम दिया गया है। पुलिस के अनुसार, आरोपी मृतक छात्र का परिचित था और दोनों के प्रेम संबंध थे। हालांकि,कुछ महीने पहले दोनों का रिश्ता समाप्त हो गया। रिश्ता खत्म होने के गुस्से में आरोप द्वारा युवती की हत्या कर दी। फिलहाल पुलिस ने मामला दर्ज कर आरोपी की खोजबीन शुरू कर दी है।

# ध्वनी प्रदूषण मुक्तीसाठी तक्रार निवारण प्रणाली कार्यान्वित

**मनपा व पोलीस आयुक्तालयतर्फे नागरिकांसाठी सुविधा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेने पुढाकार घेत नागपूर शहर ध्वनी प्रदूषण मुक्त करण्याच्या दिशेने पाऊल टाकत ध्वनी प्रदूषणाच्या संदर्भात तक्रार निवारण करण्यासाठी विशेष संकेतस्थळ लोकांसाठी कार्यान्वित केले आहे. याउपक्रमासाठी नागपूर पोलीस आयुक्तालयाचे सहकार्य मिळाले आहे. या संकेतस्थळांवर नागरिकांना तक्रार दाखल करता येईल.

माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निदेर्शानुसार 'ध्वनीप्रदूषण मुक्त' नागपूर ही नागरिकांसाठी विशेष तक्रार निवारण प्रणाली सुरू करण्यात आली आहे. नागपूर शहराला शांत, सुरक्षित व निरोगी बनवणे तसेच प्रत्येक नागरिकाला ध्वनिप्रदूषणविरोधी तक्रार करण्याचा सोपा, निःशुल्क आणि वेळेवर हाताळला जाणारा पर्याय उपलब्ध करून देणे हे प्रणाली मागील उद्दिष्ट आहे.

वाहतूक, बांधकाम, डीजे, लाऊडस्पीकर,फटाके व औद्योगिक स्त्रोतांमुळे निर्माण होणारा आवाज हा नागरिकांच्या आरोग्यावर, अभ्यासावर आणि दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम करू शकतो, म्हणून यावर प्रभावी, समयसूचक आणि जबाबदार यंत्रणा उभी करण्यासाठी ही प्रणाली आवश्यक आहे.

### तक्रार दाखल करण्याची पद्धत

तक्रार दाखल करण्यासाठी मोबाईल / संगणकावर https://noisefreenagpur.in/ या पोर्टलवर जा. संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावर 'Register' करून खाते तयार करा. नंतर 'File Complaint' हा पर्याय निवडा. घटनास्थळाचा पत्ता, स्त्रोत, वेळ व वर्णन नोंदवा उपलब्ध असल्यास 'फोटो/ व्हिडिओ/ ऑडिओ' पुरावा जोडा : LiveDecibel Meter वापरून आवाजाची प्रत्यक्ष पाहणी करा. तक्रार आपोआप त्या भागातील पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांकडे वर्ग होईल. याचवेळी एक संदर्भ क्रमांक जनरेट होईल. हा क्रमांक जपून ठेवाः कोणत्याही वेळी 'Track Complaint' द्वारे तक्रारीची स्थिती पाहता येईल.

ही सेवा २४ तास उपलब्ध असून कुठल्याही मोबाईल, संगणक, टॅब्लेटद्वारे तक्रार नोंदविता येत असून, निनावी तक्रार नोंदविण्याचा पर्याय देखील नागरिकांसाठी उपलब्ध आहे. तक्रारीसाठी मनपाच्या सोशल मीडियावर तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यात व सूचना फलकांवर उपलब्ध करून दिलेल्या QR कोडचा वापर करता येऊ शकते. नागपूर ध्वनिप्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असून पोर्टलचा नागरिकांनी परिचितांमध्ये (शेजारी, गृहनिर्माण संस्था, शाळा-महाविद्यालय,व्यापारी संघटना व सामाजिक संस्थां) प्रसार व प्रचार करून ही माहिती पोहचवावी असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

### तक्रार निवारण प्रणालीचे वैशिष्ट्ये

नॉईज फ्री नागपूरः ध्वनीप्रदूषणाच्या तक्रारीवर अवघ्या ३० मिनिटांत कारवाई. तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवण्याची सोय. ३० मिनिटांत दखल न घेतल्यास तक्रार थेट एसीपी, डीसीपींकडे वर्ग होणार. मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात माहिती व तंत्रज्ञान विभागाचे संचालक श्री. मिलिंद मेश्राम व माहिती व तंत्रज्ञान अधिकारी श्री. स्वप्नील लोखंडे यांच्या नियंत्रणात विकसित करण्यात आलेले असून, शहरातील ६ पोलीस परिमंडळे (झोन) आणि ३५ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

### आवाजाची तीव्रता मोजता येणार

डीजे, अवाजवी लाऊडस्पीकर, फटाके, बांधकामामुळे होणारे आवाज, वाहनांचे हॉर्न, मॉडिफाइड सायलेंसर आणि जनरेटर यांसारख्या उल्लंघनांची तक्रार करताना पोर्टलवर उपलब्ध असेल. तसेच पुरावा म्हणून फोटो, ऑडिओ अथवा व्हिडिओ अपलोड करण्याची सुविधा देण्यात आली आहे. प्रत्येक तक्रारीसोबत अचूक वेळ (टाईमस्टॅम्प) आणि जीपीएस लोकेशन जोडले जाईल.

## पुस्तकहंडीच्या माध्यमातून 'विज्ञानातील सुदर्शन'ची मुलांना भेट

**पाठ्यपुस्तकातील लेखकाच्या उपस्थितीत उत्सवाचा आनंद**



**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

श्रीकृष्ण जयंती आणि गोपाळकाल्याच्या निमित्ताने दि. रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या 'बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचनकक्षा'मध्ये दरवर्षी साकारण्यात येणाऱ्या पुस्तकहंडी उपक्रमातून यंदा सहभागी विद्यार्थ्यांना विज्ञानातील सुदर्शन या पुस्तकाची भेट देण्यात आली. उत्सवाच्या आनंदाला वाचनाची जोड देत मुलांमध्ये वाचनसंस्कृती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. यावेळी बालसाहित्यकार व पत्रकार संजय ऐलवाड, प्रसाद भडसावळे, वर्षा किराड, अपर्णा भोसले, गौरी सर्वगोड, उत्तम साळवे, मोहिनी शिंदे आदी उपस्थित होते. उपक्रमास अष्टविनायक वर्गाच्या संचालिका निरूपमा दिवेकर, संतोष कोंढेकर तसेच ग्रंथप्रेमींचे सहकार्य लाभले.

तिसरीच्या पाठ्यपुस्तकात संजय ऐलवाड यांच्या शुभ्राची बाग या धड्याचा समावेश आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील लेखकाची प्रत्यक्ष भेट आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह होता. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ऐलवाड यांनी विविध गोष्टींच्या माध्यमातून मोबाईलपेक्षा पुस्तकांशी मैत्री करा तसेच आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर आलेल्या प्रसंगांना निर्भयपणे सामोरे जा, असा संदेश दिला. प्रसाद भडसावळे यांनी सांगितले की, पुस्तकहंडी उपक्रमाचे हे २५वे वर्ष आहे. या निमित्ताने स्वतः लिहिलेले विज्ञानातील सुदर्शन हे पुस्तक मुलांना भेट देताना मनस्वी आनंद होत आहे. मुलांच्या मनात विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण व्हावे, त्यांना प्रश्न पडावेत आणि विज्ञानाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळावी, हा या पुस्तकामागील हेतू आहे. उत्सवाच्या निमित्ताने पुस्तक मुलांच्या हातात देत वाचनाची गोडी निर्माण करण्याबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोनाची बीजे रुजविण्याचा हा प्रयत्न होता.

# गणेशोत्सव शांततेत साजरा करा, डी.जे.चा वापर कमी करा पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांचे गणेश मंडळांना आवाहन

**आमगाव पोलीस ठाण्यात गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक**



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आगामी गणेशोत्सव तसेच विविध सण-उत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात साजरे करावेत. उत्सवादरम्यान डी.जे.चा वापर कमी करून ध्वनिप्रदूषणाबाबतच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन आमगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांनी केले.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आमगाव पोलीस ठाण्याच्या सभागृहात तालुक्यातील विविध गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे होते.

यावेळी मार्गदर्शन करताना कुकडे म्हणाले की, आमगाव तालुक्यात विविध धर्मांचे सण व उत्सव परस्परांमध्ये बंधुभाव, सलोखा आणि शांतता राखून साजरे करण्याची परंपरा आहे. ही सामाजिक एकोपा आणि शांततेची परंपरा यापुढेही कायम ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे.

गणेशोत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होऊ नये, यासाठी गणेश मंडळांनी आणि नागरिकांनी दक्षता घ्यावी. उत्सव साजरा करताना प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. डी.जे. व ध्वनिवर्धकांचा अनावश्यक वापर टाळून ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी मंडळांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सण-उत्सव हे सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याचे माध्यम आहेत. त्यामुळे सर्व समाजघटकांनी एकमेकांच्या धार्मिक भावना, परंपरा आणि श्रद्धांचा आदर करावा. कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता सामाजिक सलोखा कायम ठेवावा आणि शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक कुकडे यांनी केले.

दरम्यान, गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनीही आगामी गणेशोत्सव तसेच इतर सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. बैठकीत गणेशोत्सवाच्या आयोजनासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. गणेशोत्सवाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये, यासाठी मंडळांनी जबाबदारीने व संयमाने उत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

बैठकीला आमगाव तालुक्यातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन महिला पोलीस कर्मचारी सत्यशीला छिपे यांनी केले.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

# श्रीकृष्ण जन्माष्टमी : "ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः ॥" उद्घोष

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

श्रीकृष्ण जन्माष्टमी हा श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाचा पवित्र हिंदू सण आहे, जो कृष्ण जन्माष्टमी श्रावण किंवा भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमीला साजरा केला जातो. मथुरेमध्ये कंसाच्या बंदिशाळेत मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर श्रीकृष्णाचा जन्म झाला. दुसरा दिवस- गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडीचा उत्सव महाराष्ट्रसह देशभरात अत्यंत आनंदाने साजरा केला जातो. मथुरा, वृंदावन, गोकुळ आणि द्वारकेमध्ये या दिवशी विशेष पूजा व सोहळे होतात. भाविक जन्माष्टमीच्या दिवशी दिवसभर उपवास करतात आणि कृष्ण जन्माष्टमीच्या रात्री उपवास सोडतात. पाळण्यात बालगोपाळाची- श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून सनातन संस्थानुसार रात्री १२ वाजता पाळणा गाऊन पूजा केली जाते. श्रीकृष्णाला लोणी, साखर व धने-जिऱ्याची पंजीरी यांचा नैवेद्य दाखवला जातो.

भगवान श्रीविष्णुचा पूर्णावतार असलेल्या श्रीकृष्णाने श्रावण कृष्ण पक्ष अष्टमीला पृथ्वीतलावर जन्म घेतला. ती वेळ मध्यरात्री, रोहिणी नक्षत्रावर चंद्र वृषभ राशीत असतांनाची होती. हा दिवस कृष्ण जन्माष्टमी, गोकुळाष्टमी, श्रीकृष्ण जयंती आदी नावांनी ओळखला जातो. कृष्ण जन्माष्टमी या दिवशी भगवान कृष्णाचे तत्त्व वातावरणात नेहमीपेक्षा १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी "ॐ नमो भगवते वासुदेवाय।" हा नामजप, तसेच श्रीकृष्णाची अन्य उपासना भावपूर्ण केल्यास श्रीकृष्णाचा आशीर्वाद अधिक प्रमाणात ग्रहण करता येऊन त्याचा लाभ होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या दिवशी दिवसभर उपवास करून रात्री बारा वाजता बाळकृष्णाचा जन्म साजरा करतात. त्यानंतर प्रसाद घेऊन उपवास सोडतात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी दहीकाल्याचा प्रसाद घेऊन उपवास सोडतात. श्री कृष्णाच्या जन्माची वेळ रात्री १२ वाजता असल्यामुळे त्यापूर्वी पूजनाची सिद्धता करून ठेवावी लागते. रात्री १२ वाजता शक्य असल्यास श्री कृष्ण जन्माचा पाळणा (गीत) गायले किंवा वाजविले जाते.

मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तामिळनाडू येथे साजरा केला जातो. याशिवाय भारतातील इतर सर्व राज्ये आणि उमरकोट, थारपारकर, मीरपूरखास आणि संपूर्ण सिंध पाकिस्तानमध्ये देखील हा उत्सव साजरा केला जातो. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका,जगन्नाथ पुरी या ठिकाणी वैष्णव संप्रदायाचे वैशिष्ट्य असलेली मंदिरे असल्याने तो येथे मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. ओरिसामध्ये दहीहंडी जत्रा किंवा दहीभंगा जत्रा या दिवशी साजरी केली जाते. गोकुळ अष्टमीच्या दिवशी उपवास करण्याची प्रथा आहे. गुजराथमध्ये 'सातम' म्हणजे सप्तमीच्या दिवशी पैसे लावून किंवा तसेच दिवसभर पत्ते खेळतात. रात्री बारा वाजता पत्ते बंद करून कृष्णजन्माचा उत्सव सुरू करतात. मध्य प्रदेशात आणि उत्तरी भारताच्या बऱ्याचशा भागात पौर्णिमान्त महिना असलेले पंचांग वापरात असल्याने या दिवशी त्यांची भाद्रपद कृष्ण अष्टमी येते. या दिवशी कित्येकांच्या घरी गोकुळ-वृंदावनाचा देखावा तयार करून जन्मोत्सव साजरा करतात. वैष्णव लोक तर हा दिवस विशेष भक्तीभावाने पाळतात. वृंदावन येथे या दिवशी दोलोत्सव असतो. याच दिवशी कृष्णाच्या आयुष्यातील महत्त्वाची संकल्पना रासलीलांचे सादरीकरण केले जाते. मणिपूर येथे दिवसभर उपवास करून रात्री कृष्णाची पूजा केली जाते. हनुमान मंदिर, गोविंदजी मंदिर येथे विशेष पूजा होते, जत्रा भरते, लोक उत्सवाचा आनंद घेतात.

**व्रत** : अष्टमीच्या दिवशी एकभुक्त राहून पांढऱ्या तिळाचा कल्क अंगाला लावून स्नान करतात.



व्रताचा संकल्प करून देवघर लता पल्लवीने सुशोभित करतात. त्या स्थानी देवकीचे सूतिकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि कृष्ण यांच्या मूर्तींची स्थापना करतात.

दुसऱ्या बाजूला यशोदा आणि तिची नवजात कन्या, वसुदेव, नंद, यांच्या मूर्ती बसवितात. सप्तमीच्या मध्यरात्री शुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सहपरिवार श्रीकृष्णाची षोडशोपचारे पूजा करतात. रात्रौ कथा, पुराण, नृत्य, गीत इ. कार्यक्रमांनी जागरण करतात. अष्टमीच्या दिवशी उपवास करतात व देवालाही फराळाच्या जिन्नसांचा नैवेद्य दाखवितात. नवमीच्या दिवशी पंचोपचार करून उत्तरपूजा करून महानैवेद्य समर्पण करतात. पूजा झाल्यानंतरचे कृत्य अग्नी पुराणात सांगितले आहे. त्याप्रमाणे पूजा करून पुरुषसूक्ताने, विष्णूसूक्ताने व इतर स्तोत्रांनी स्तवन करावे. वाद्यांचा घोष, गीतांचे मंगल स्वर, पुराण-इतिहासातील निरनिराळ्या सत्कथा ऐकत ती रात्र घालवली जाते. गोकुळातील श्रीकृष्णजन्माच्या लीला श्रवण केल्यानंतर वैष्णवांनी परस्परांवर दही इ.चे सिंचन करावे. कारण गोपाळांनी दही, दूध, तूप, उदक, यांनी परस्परांवर सिंचन व लेपन केले, असे भागवतामध्ये वचन आहे, त्यावरून असा विधी प्राप्त होतो. कृष्णाला लोणी आणि साखर एकत्र करून त्याचा प्रसाद दिला जातो. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी!

– ९४२३७१४८८३

# भगवान श्रीकृष्णाची महिमा अपरंपार

रमेश लांजेवार
नागपूर

श्रावण कृष्णपक्ष अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव संपूर्ण भारतात गोकुळ अष्टमी किंवा श्रीकृष्ण जन्माष्टमी या नावाने मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा केल्या जातो. पौराणिक कथेनुसार कृष्णाचा जन्म मथुरा येथे वासुदेव आणि देवकीच्या पोटी झाला. तेव्हा या दोघांना कंसाने बंदीस्त करून ठेवले होते. कंस हा अहंकारी राजा होता.त्याच्या अहंकाराने प्रजा अत्यंत त्रस्त होती.अशा परिस्थितीत आकाशवाणी होते. त्यात कंसाला सांगितले जाते की हे कसं तुझा शेवट देवकीचा आठवा पुत्र करेल. आकाशवाणीमुळे कंस भयभीत होतो आणि वासुदेव व देवकीला बंदीस्त करतो.अशा परिस्थितीत देवकीला सात पुत्र होतात त्यांचा सर्वांचा वध कंस करतो. यात आठवा पुत्र श्रीकृष्ण वाचतो आणि पुन्हा आकाशवाणी होते हे कंसा ज्याच्या हातांनी तुझा मृत्यू होणार आहे त्यांनी जन्म घेतलेला आहे सावधान! महाभारत ही पौराणिक कथा आहेच. परंतु आपल्या जीवनात घडणारे प्रसंग सुध्दा आहेत.जन्माष्टमीचा सण श्रावण महिन्यातील कृष्णपक्षातील अष्टमीला साजरा करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. श्रावण महिन्यांतील कृष्णपक्षातील अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला. जन्माष्टमीच्या दिवशी लोक भक्तिभावाने उपवास करून पुजाअर्चना करतात व श्रीकृष्णाच्या जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. हा उपवास नवमीला संपतो. संपुर्ण भारतात आपल्याला जन्माष्टमीचा अनेक मोठ-मोठे कार्यक्रम पहायला मिळतात. या निमित्ताने मोठ्या प्रमाणात दहिहंडीचे कार्यक्रम दिसून येतात.

अनेक बालगोपाल (गोविंदा)या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा करतात. जन्माष्टमीच्या दिवशी अनेक भाविक श्रीकृष्णाची स्थापना करतात व मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात येते. कोणाकडे श्रीकृष्ण (काणोबा) दिड दिवसांचा असतो तर कोणाकडे पाच दिवसांचा असतो. या कालावधीत पुजाअर्चना करून आपली मनोकामना पूर्ण करण्याचे साकडे भक्तगण घालतात व विसर्जनाच्या दिवशी घरगुती दहिहांडी फोडून काला करतात आणि सर्वांना प्रसाद म्हणून वाटण्यात येतो.

भगवान श्रीकृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत.अहंकारी कंसाचा वध करण्यासाठी भगवान विष्णूंनी श्रीकृष्णावतार धारण केला व कृष्णाने मामा कंसाचा वध केला.ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्ण लहाण्याचे मोठे झाले ते ठिकाण म्हणजे उत्तर प्रदेशातील (मथुरा-वृंदावन) याठिकाणी जन्माष्टमीला मोठे उत्साहाचे आनंदाचे वातावरण असते.भारतातील संपूर्ण श्रीकृष्ण मंदिरांची सजावट करून मोठ्या थाटामाटात उत्सव साजरा केला जातो. भारतातील जगप्रसिद्ध मथुरा आणि वृंदावनमधील सर्व श्रीकृष्ण मंदिरे पहाण्यासाठी देशातील तसेच जगाच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण व पर्यटक इथे येऊन श्रीकृष्णाचे दर्शन घेतात. गुजरातमधील व्दारका येथे एक वेगळा उत्सव साजरा केला जातो या ठिकाणी कृष्णाने आपले राज्य स्थापन केले होते. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये जन्माष्टमीच्या दरम्यान दही हंडीचे कार्यक्रम करून उत्सव साजरा करतात. त्याचप्रमाणे गुजरात मधील कच्छ जिल्ह्यातील शेतकरी बैलगाड्या सजवून त्यावर भगवान श्रीकृष्णाची मूर्ती ठेवून नाचत-गाजत मिरवणुक काढतात. अशाप्रकारे संपूर्ण भारतात जन्माष्टमी आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. महाभारतात श्रीकृष्णाने सत्याची बाजू घेत शेवटपर्यंत अर्जुनाचे सारथी राहले. बाळ श्री कृष्ण दही आणि लोणी नेहमी खायचा त्यांचे आवडीचे प्रतीक



आणि आपल्यासाठी प्रसाद म्हणून महाराष्ट्रात दहीहंडीची प्रथा आहे.

जन्माष्टमी भारतातच नाही तर जगातील अनेक देशांतील भारतीय श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या थाटामाटात साजरी करतात. कारण भारतातील संस्कृतीने अनेक देशांना बरेच काही दिले आहे. देवकी मानवी देहाचे प्रतीक मानले जाते तर वासुदेव प्राणशक्तीचे प्रतीक आहे. मानवी देहामध्ये जेव्हा प्राणशक्ती वृध्दिंगत होते तेव्हा भगवान श्रीकृष्णाची म्हणजे आनंदाची अनुभूती प्राप्त होते.त्यामुळे आपल्याला सर्वत्र मंगलमय वातावरण दिसून येते. सृष्टीचे पालनहार म्हणजे विष्णूचे आठवे अवतार भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मत्सोवाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला पाहिजे. कारण बदलत्या हवामानामुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे निसर्गाचे संतुलन दिवसें-दिवस डगमगत आहे. यामुळे प्रत्येक सणासुदी वृक्षलागवड काळाची गरज आहे.त्याचप्रमाणे श्रीकृष्णाचा सहवास नेहमीच बालगोपालांसोबत वृक्षांच्या सानिध्यात राहायचा. त्यामुळे आज आपणास सर्वांवर ती वेळ येऊन ठेपली आहे की वृक्ष बिना जीवन अधुरे आहे. यामुळे आज वृक्ष लागवड अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल,गुरांना चारा उपलब्ध होईल, ऑक्सिजनची मात्रा वाढेल व संपूर्ण भारत भुमि (सृष्टी) प्रफुल्लित राहील आणि निसर्गाची व पृथ्वी मातेची रक्षा करण्यास मोठी मदत होईल. गोकुळ अष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा!

– ९९२१६९०७७९

# अभूतपूर्व कार्याने तुकाराम मुंडे आणि वैभव गायकवाड विलक्षण चर्चेत

सुनील शिरपुरे
यवतमाळ

सध्या महाराष्ट्रातील धडाडीचे आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळख असलेल्या आयएएस तुकाराम मुंडे यांच्या कार्यशैलीची जोरदार चर्चा होत असताना तेलंगणात महाराष्ट्राच्या मातीतून गेलेल्या एका आयपीएस अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षमतेची वेगळी छाप निर्माण केल्यामुळे तेही चर्चेच्या अग्रस्थानी आहे. तेलंगणासह हैदराबादमध्ये भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्या भेसळखोरांवर कठोर कारवाई करण्याचा विडाच वैभव गायकवाड यांनी उचलल्याचं त्यांच्या कारवाईतून पाहायला मिळत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पिंपळगाव माळवी येथील मूळ रहिवासी असलेले आयपीएस अधिकारी वैभव रघुनाथ गायकवाड यांनी तेलंगणा कॅडरमध्ये विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत गुन्हेगारीविरोधात धडक कारवाईचा धडाका कायम ठेवला आहे. सध्या ते हैदराबाद शहरात डीसीपी, टास्क फोर्स म्हणून कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वाखाली संघटित गुन्हेगारी, राऊडीशीटर्स, अवैध धंदे, अमली पदार्थांची तस्करी तसेच अन्नभेसळीविरोधात प्रभावी कारवाया सुरू आहेत.

आयपीएस वैभव गायकवाड हे भारतीय पोलीस सेवेत २०१८ मध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांची तेलंगणा कॅडरमध्ये नियुक्ती झाली. तेलंगणामध्ये त्यांच्या सेवेला नालगुंडा जिल्ह्यात प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून सुरुवात झाली. त्यानंतर वरंगळ येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. वरंगळमध्येच अप्पर पोलीस उपआयुक्त (प्रशासन) तसेच टास्क फोर्स या महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही त्यांनी पार पाडल्या. त्यानंतर पेद्दापल्ली आणि नागरकर्नूल या दोन जिल्ह्यांत पोलीस अधीक्षक म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. विविध जिल्ह्यांमध्ये काम करताना कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी नियंत्रण, तपास आणि प्रतिबंधात्मक पोलिसिंगचा व्यापक अनुभव त्यांना मिळाला. डिसेंबर २०२५ पासून ते हैदराबाद शहरात पोलीस उपायुक्त, टास्क फोर्स म्हणून कार्यरत आहेत.

हैदराबाद शहरातील टास्क फोर्सची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. संघटित गुन्हेगारी, गुंडागर्दी, राऊडीशीटर्स, अवैध धंदे, संवेदनशील व गंभीर गुन्ह्यांचा तपास आणि शोध तसेच मोठ्या प्रमाणातील मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणण्याचे काम या विभागामार्फत केले जाते. याशिवाय गणपती, दुर्गाष्टमी, मिलाद-उन-नबी, मोहरम आणि बोनालूसारख्या मोठ्या धार्मिक व संवेदनशील कार्यक्रमांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे, सुरक्षा बंदोबस्ताचे नियोजन करणे आणि संभाव्य धोके टाळणे ही महत्त्वाची जबाबदारीही टास्क फोर्सकडे असते.

टास्क फोर्सच्या जबाबदारीसोबतच वैभव गायकवाड हे हैदराबाद शहर अंमली पदार्थ, मादक द्रव्य विरोधी पथकचे प्रभारी आहेत. याचबरोबर मार्च २०२६ मध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला. हैदराबादसारख्या मोठ्या शहरात अन्नभेसळ, अन्नसुरक्षेशी संबंधित तक्रारी आणि अन्न विषबाधा (फुड पायझनिंग) च्या घटना सातत्याने समोर येत होत्या. अन्न सुरक्षा (फूड सेफ्टी) विभागाकडे मनुष्यबळ आणि इतर संसाधने मर्यादित असल्याने शहरातील मोठ्या प्रमाणावरील अन्नभेसळीवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे आव्हानात्मक होते. ही बाब लक्षात घेऊन हैदराबाद शहर पोलीसच्या माध्यमातून हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) या स्वतंत्र पथकाची निर्मिती करण्यात आली. पोलिसांकडील गुप्त माहिती, क्षेत्रीय माहिती संकलन, तपास आणि अंमलबजावणीची क्षमता अन्न सुरक्षा (फूड सेफ्टी) विभागाच्या तांत्रिक कौशल्यासोबत जोडण्यात आली आहे. अन्न सुरक्षा अधिकारी (एफएसओ) आणि महानगरपालिका अधिका-यांच्या समन्वयाने संयुक्त छापे, नमुने संकलन, पुरावे गोळा करणे आणि कायदेशीर कारवाई केली जात आहे.

मार्च २०२६ पासून हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) ने अन्नभेसळीविरोधात बुद्धिमत्ता-आधारित कारवाई सुरू केली. विविध खाद्यपदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीच्या ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त साहित्य जप्त करण्यात आले. मार्च २०२६ पासून आतापर्यंत २०८ गुन्हे दाखल करण्यात आले असून २३२ प्रकरणे अन्न सुरक्षा अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली आहेत. या कारवाईदरम्यान तब्बल २ लाख ९२ हजार २९८ किलो म्हणजेच सुमारे २९२ टन भेसळयुक्त साहित्य जप्त करण्यात आले आहे. यामध्ये मसाले, तूप, दुग्धजन्य पदार्थ, मांसजन्य पदार्थ, चहा, फळे, बेकरी उत्पादने, आलं-लसूण पेस्ट यांसह विविध खाद्यपदार्थांचा समावेश आहे. तपासादरम्यान खाद्यपदार्थांमध्ये कपडे रंगवण्याचे रंग, कृत्रिम रंग, हानिकारक रसायने, पाम तेल, वनस्पती, पिष्ट (स्टार्च) तसेच इतर अपायकारक पदार्थांचा वापर करून भेसळ केली जात असल्याचे निदर्शनास आले.

हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) चे वैशिष्ट्य म्हणजे केवळ एखाद्या दुकानावर छापा टाकून कारवाई करण्याऐवजी भेसळीचा स्त्रोत आणि संपूर्ण पुरवठा साखळी शोधण्यावर भर दिला जात आहे. तक्रारी, गुप्त माहिती आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील माहितीच्या आधारे संशयित व्यवसायांची ओळख केली जाते. त्यानंतर अन्न सुरक्षा अधिकारी आणि ग्रेटर हैदराबाद महानगरपालिका (जीएचएमसी) अधिकाऱ्यांच्या सहकार्याने संयुक्त कारवाई केली जाते. नमुने संकलित करणे, पुरावे गोळा करणे, भेसळीचे मूळ ठिकाण शोधणे, पुरवठा साखळीचा मागोवा घेणे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करणे अशा पद्धतीने ही मोहीम राबविण्यात येत आहे. अन्न भेसळी विरोधात पोलिस यंत्रणेचा थेट सहभाग घेऊन स्वतंत्र पथकाच्या माध्यमातून काम करण्याचा हा अभिनव प्रयोग असून नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

हैदराबाद शहर अंमली पदार्थ विरोधी पथकाने मागील आठ महिन्यांत अमली पदार्थांविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे. या कालावधीत ४०० पेक्षा अधिक गुन्हे दाखल करण्यात आले असून २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. एका मोठ्या कारवाईत सुमारे ३ कोटी रुपये किमतीचे गांजाचे तेल (हॅश ऑईल) जप्त करण्यात आले. तसेच एका महत्त्वपूर्ण प्रकरणात झारखंडमधील रांची आणि मुंबई येथून दोन आरोपींना अटक करण्यात आली. हे आरोपी स्पीड पोस्टच्या माध्यमातून जवळपास २२ राज्यांमध्ये गांजाचा पुरवठा करत असल्याचे तपासात समोर आले. मुंबईत लोकल ट्रेनच्या माध्यमातून घरपोच गांजाची डिलिव्हरी केली जात असल्याचेही तपासातून उघड झाले. या कारवाईत जवळपास ५ कोटी रुपयांचे संपूर्ण ड्रग नेटवर्क उघडकीस आणण्यात आले. अमली पदार्थांच्या व्यवसायात सहभागी असलेल्या तसेच व्हिसाची मुदत संपल्यानंतरही भारतात बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या ३५ विदेशी नागरिकांना देशातून हद्दपार करण्यात आले आहे. तसेच त्यांना भारतात पुन्हा प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचा दृष्टिकोन केवळ अमली पदार्थांचा पुरवठा करणा-यांवर कारवाई करण्यापुरता मर्यादित नाही. अमली पदार्थांची मागणी कमी करण्यासाठीही विशेष प्रयत्न केले जात आहेत. तेलंगणा सरकारने सरकारी रुग्णालयांमध्ये व्यसनमुक्ती केंद्र सुरु केले आहेत. अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींना या केंद्रांमध्ये उपचार, व्यसनमुक्ती आणि पुनर्वसनासाठी पाठविले जात आहे. हैदराबाद शहरात अलीकडच्या काळात जवळपास २ हजार व्यक्तींची अंमली पदार्थ तपासणी (ड्रग टेस्टिंग) करण्यात आली. त्यापैकी सुमारे ८०० व्यक्ती ड्रग पॉझिटिव्ह आढळल्या. या सर्वांना पुढील व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले. यामध्ये केवळ गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले किंवा राऊडीशीटर्सच नव्हे, तर गुंडागर्दीत सहभागी व्यक्ती, रस्त्यावरील गुन्हेगारीमध्ये सहभागी असलेले तसेच सुशिक्षित आयटी आणि इतर क्षेत्रात नोकरी करणाऱ्या व्यक्तींचाही समावेश असल्याचे समोर आले.

अमली पदार्थ विरोधातील लढा केवळ तस्कर आणि पुरवठादारांवर कारवाई करण्यापुरता मर्यादित न ठेवता त्याची मागणी कमी करण्यावरही भर दिला जात आहे. व्यसनाधीन व्यक्तींना उपचार व पुनर्वसनाच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हैदराबाद शहर पोलिसांकडून पुरवठा आणि मागणी या दोन्ही बाजूंवर एकाच वेळी लक्ष केंद्रित केले जात आहे. अमली पदार्थांचा गैरवापर रोखणे, तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवणे आणि समाजाचे भविष्य सुरक्षित करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पिंपळगाव माळवी येथून भारतीय पोलीस सेवेत दाखल झालेल्या वैभव रघुनाथ गायकवाड यांनी तेलंगणातील विविध आव्हानात्मक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत आपल्या कामाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. टास्क फोर्स, अमली पदार्थ विरोधी पथक आणि हैदराबाद अन्न भेसळ पाळत ठेवणे (सर्वेक्षण) पथक (एच-फास्ट) सारख्या महत्त्वाच्या जबाबदा-यांमधून त्यांनी गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाईसोबतच गुप्त माहितीच्या आधारे तपास आणि प्रतिबंधात्मक पोलिसिंगवर भर दिला आहे.

– ७४९८८८५०६१